


श्री साईनाथ वाचनालय

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

[ १०.८१ ]

श्रीबाबांची समाधी

[ किंमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


**श्रीसाई वाक्सुधा**


वर्ष ५९ वे)   किंमत एक रुपया   (अंक ११ वा


**श्री साईकाव्यबहार विशेषांक**


: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३२६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ ३



## श्रीसाई वाक्सुधा

ज्ञानी अज्ञानी सर्व आश्रित ।
सर्वांवरी प्रेम अत्यंत ।
जीवाहूनि मानी आप्त ।
भेद ना तेथ यत्किंचित ॥१२६॥

मनुष्यरूपें देवचि होते ।
जरी हें आणिलें प्रचीतीतें ।
परी त्याचिया लडिवाळतेनें ।
बळी पडले ते समस्त ॥१२७॥

कोणास दिधली धनसंपत्ति ।
कोणास संसारसुख संतति ।
तेणें महान पडली भ्रांति ।
ज्ञानप्राप्तीस आंचवले ॥१२८॥

कधीं जया सर्वे हांसत ।
तया अंगी अभिमान दाटत ।
कीं तया वरीच प्रेम अद्भुत ।
इतरां न दावीत तें तैसें ॥१२९॥

तेंच कोणा क्रोधें वदतां ।
म्हणती न तो तयां आवडतां ।
आम्हां विशींच अधिक आदरता ।
इतरां न देतात तो मान ॥१३०॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४३ वा

## सु स्वा ग त

श्रीसाईलीलाच्या
सातव्या
लेखक—कवी
स्नेहसंमेलन प्रसंगी
आम्ही सर्व लेखक—कवी
हितचिंतक या
सर्वांचे हार्दिक
स्वागत करीत
आहोत.

—संपादक

# श्रीसाईनाथ भूवरी अवतरले भक्त कल्याणार्थ

भगवान श्री साईबाबा काव्य व हार विशेषांक




किती मनोहर मूर्ति साईची आनंद वाटे मना ।
जणू अवतरले साई दत्त राणा ।।
ब्रह्मांड व्यापका त्रैमूर्ति तू साईदत्त देवा ।
कृपा करूनी दुःख संकटातूनी भक्ता सुखी ठेवा ।।

# श्रीसाईलीला काव्यबहार अंकाचे मानकरी
# फेब्रुवारी १९८१


१) संपादकीय
२) श्री. प. पू. बापूसाहेब निरखे
३) प. पू. श्री गोदावरी माताजी
४) प. पू. श्री स्वामी संजयानंद
५) प्रा. र. श्री. पुजारी
६) डॉ. विनायक दुर्गे
७) डॉ. सौ. सुमती खानविलकर
८) डॉ. वसंत पात्रीकर
९) डॉ. सौ. मालती राहाटे
१०) सौ. उषा अधिकारी
११) डॉ. इंदूताई नाईक
१२) डॉ. रा. सी. कापडी
१३) सौ. तारा चेंदवणकर
१४) प्रा. गुंडेराव पटवारी
१५) सौ. मीना खाडीलकर
१६) श्री. दा. र. दळवी
१७) श्री. रमाकांत पंडित
१८) सौ. लीला मराठे
१९) श्री. विजय हजारे
२०) सौ. सुनिता विचारे
२१) कु. शशिकला साळगावकर
२२) श्री. रमेश चव्हाण
२३) श्री. ग. रा. पालकर
२४) सौ. आशा इंगळे
२५) श्री. विनायक पाठक
२६) श्री. दत्तात्रय मोरे
२७) श्री. म. द. भिडे
२८) श्री. डी. वी. जगतपुरीया
२९) श्री. गं. दे. कुलकर्णी
३०) श्री. श्रीराम आठवले
३१) श्री. उज्जवल कुलकर्णी
३२) श्री. बबन डी. येरम
३३) श्री. जगदीश देवपूरकर
३४) श्री. बी. व्ही. लांजेकर
३५) श्री. मधुकर मंडलीक
३६) श्री. नागेश मोगलाईकर
३७) सौ. चंद्राबेन भाटे
३८) श्री. एन. जी. परुळेकर
३९) सौ. कलावती चव्हाण
४०) सौ. शशिकला रेवणकर
४१) श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
४२) श्री. डी. वी. पोतनीस
४३) सौ. सरला गर्जे
४४) श्री. प्रभाकर कोळमकर
४५) श्रीमती लीला गुजराथी
४६) डॉ. ग. स. कामत
४७) श्री. चंद्रशेखर लिगाडे
४८) श्री. दशरथ तळेकर
४९) श्री. स. मा. मुन्हार
५०) श्री. सुहास देसाई
५१) पुस्तक परीक्षण
५२) शिर्डीवृत्त–नव्हेंबर–डिसेंबर ८०
५३) श्री. साईपरिवार वृत विशेष
५४) श्री. तातू देशपांडे निधन

# श्रीसाईलीलाचे सातवे लेखक-कवी संमेलन




श्रीसाईलीला मासिकाचा हा काव्य बहार विशेषांक साईभक्त वाचकांच्या रसिक कवींच्या- कवयत्रींच्या हाती देण्यात आज आनंद होत आहे. विशेषतः श्रीसाईलीला मासिकाच्या सातव्या लेखक कवी संमेलन प्रसंगी तो अध्यक्षांचे शुभहस्ते आपल्या हाती देत आहोत याचे मोठे समाधान वाटते. भक्तांनो आपण जर हा अंक नुसता चाळलात तर अनेक उच्चविद्या विभूषित अशा लेखक-कवींचे सहाय्य या अंकाला लाभलेले आहे हे तुम्हास दिसून येईल. हे मिळालेले सहाय्य उपयोगात आणताना त्याला किती कष्ट पडले असतील याची कदाचित आपणाला कल्पना नसेल पण ती कल्पना तुम्हाला यायलाच नको. आपण सर्वांनी हा अंक पाहून निदान समाधान जरी व्यक्त केलेत तरी आमचे कष्ट, श्रम क्षणार्धात दूर झाल्यासारखे आहेत.

श्रीसाईलीलाच्या लेखक-कवींचे सातवे संमेलन शिरडीस भरत आहे. अंकातून लेखन करीत असलेली मंडळी या संमेलनाच्या निमित्याने एकत्र येतात दोन दिवस आचार विचारांचे आदात प्रदान करतात व त्याचा उपयोग विविधांगी असा होत असतो असे आढळून आले आहे. प्रत्यक्ष लेखन करणाऱ्या मंडळींना अतिशय जवळून पहाता येते हा पण एक मोठाच फायदा आहे. प्रती वर्षा प्रमाणे हे संमेलनही यशस्वी पार पडो अशी शुभकामना श्रीसाईचरणापाशी व्यक्त करतो.

# धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा रौप्य महोत्सवी सोहळा

कु. रेखा दिघे
वरिष्ठ लेखापाल, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी.

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयास २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक सोहळा आयोजित करण्यांत आला होता. हा वरवर छोटासा वाटणारा परंतु भव्य व आगळा असा कार्यक्रम दादर येथील शिवाजी मंदीरमध्ये सोमवार दि. १९।१।८१ रोजी मोठ्या थाटाने पार पडला. प्रथम दालनापासूनच मंगल सनईचे सूर निमंत्रितांना मोहून टाकत होते. दालनांतच चॅरिटी कमिशनर व त्यांचे अधिकारी निमंत्रितांच्या स्वागतासाठी जातीने हजर होते. आंतील बसण्याची व्यवस्थादेखील तेथील कर्मचारी वर्ग जातीने लक्ष घालून पहात होता. येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिकडे लक्ष पुरविले जात होते. अशाप्रकारे या सोहळयास ४·०० वाजतां प्रारंभ झाला. प्रथम श्री. कदम डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी सर्वांचे हार्दिक स्वागत केले. श्री. बाबासाहेब भोसले कायदा व न्याय मंत्री यांनी अध्यक्षस्थान भूषविले होते. निरनिराळया प्रमुख धर्मादाय संस्थांचे विश्वस्त यावेळी खास निमंत्रित म्हणून हजर होते. त्यांचेतर्फे मा. बाबासाहेब भोसले यांचा हार घालून सत्कार करण्यांत आला. साईबाबा संस्थान हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य असे संस्थान असून, याचा सर्व व्यवहार अत्यंत चोखपणे संभाळला जातो. महाराष्ट्रातील एक नामवंत व प्रामुख्याने उल्लेख करण्यासारखेच हे संस्थान आहे असा घवघवीत उल्लेख श्री. देशपांडे, डायरेक्टर ऑफ अकौन्टस् यांनी केला. मा. बाबासाहेब भोसले यांचा, श्रीसाईबाबा संस्थानचे मुख्य लेखाधिकारी श्री. व्ही एस्. आपटे यांनी हार घालून सत्कार केला. त्याचप्रमाणे सौ. भोसले बाईसाहेब यांचा देखील सत्कार करण्याची बाजू, साईबाबा संस्थानच्या वरिष्ठ लेखापाल कु. रेखा दिघे यांनी सौ. भोसले यांना हार घालून संभाळली.

त्यानंतर माजी धर्मादाय आयुक्तांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यांत आला. ज्या कर्मचारी वर्गाची २५ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना एक मानचिन्ह देऊन त्यांचाही यथायोग्य सत्कार मा. बाबासाहेब भोसले यांचे हस्ते करण्यांत आला. श्री. जी. एस्. पांडे, धर्मादाय आयुक्त यानी लिहिलेले पब्लीक ट्रस्ट ॲक्ट, हे पुस्तक व रौप्य महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. वेगवेगळया

स्टच्या विश्वस्थांनी धर्मादाय आयुक्तांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांबद्दल आपआपल्या परीने प्रशंसोद्गार काढून त्यांचे कौतुक केले.

महाराष्ट्र हे विविध जाती व जमातीच्या लोकांच्या वास्तव्याचे ठिकाण. इथे सर्व भाषांचे व धर्मांचे लोक एकत्र नांदतात. श्री. विजय मर्चंट यांनी स्वतःच्या मराठीत उत्कृष्ट भाषण केले. तर श्री. रुईया यांनी हिंदी भाषेची जाणीव करून दिली. घाटकोपर येथील एका प्रतिष्ठित विश्वस्तांनी गुजराथीचा आदर लोकांपुढे दर्शविला, तर श्री. गोगटे यांनी मराठी भाषेचा गौरव कायम ठेवला. षण्मुखानंद सोसायटीचे विश्वस्तांनी इंग्रजी भाषेची आठवण करून दिली. परंतु या सर्वांनी आपल्या इच्छेप्रमाणे, महाराष्ट्रातील सर्व भाषेंचा उल्लेख करून, महाराष्ट्र हा सर्व भाषिक व सर्व जातीय आहे ही भूमिका कायम ठेवली. परंतु या सर्व खेळाडूंच्या खेळाला रंग भरला तो श्री. गुलाम दस्तगीर यांच्या सेंचुरीने. त्यांनी सर्व भाषांचे मूळ संस्कृत भाषाच आहे यांची सर्व लोकांना अत्यंत प्रकर्षाने स्वतः अस्खलीत संस्कृतमध्ये भाषण करून जाणिव करुन दिली.

मा. धर्मादाय आयुक्त श्री. जी. एस्. पांडे यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या कामाची थोडक्यात रुपरेषा, उपस्थित मंडळींपुढे मांडली. त्यानंतर मा. बाबासाहेब भोसले यांनी, एकतावाद अंगी ठेवूनच, सर्व कर्मचाऱ्यांनी आपले कार्य चोखपणे करीत राहावे हीच खरी ईश्वर सेवा आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा आहे. ईश्वर जसा भक्ताने आणलेला प्रसाद ग्रहण न करता, फक्त पहातो, भक्तांच्या इच्छा मात्र पूर्ण करतो तसेच धोरण प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा सोप्या भाषेतील शुभसंदेश दिला. कार्यक्रमाची सांगता करणारी गोड कामगिरी श्री. जाधव डेप्युटी चॅरिटी कमिशनर यांनी केली.

अशातऱ्हेने धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाची सुरवात आनंदी उत्साही वातावरणात झाली.

# श्रीसाईलीला ७व्या लेखक-कवी संमेलनाच्या अध्यक्षा

## परम साईभक्त ह. भ. प. काकासाहेब महाजनींच्या सुकन्या

### सौ. सरोजिनीताई मुळये

—श्री. गजाननराव उर्फ बापूसाहेब निरखे
२० नंदलालपुरा, इंदूर



सौ. सरोजिनी मुळये

दिनांक २८-१२-८० चा दिवस माझ्यासाठी फार भाग्याचा दिवस ठरला. या दिवशी श्रीसाईबाबांना पाहिलेल्या इतकेच नव्हे तर त्यांचा सहवास लाभलेल्या व आज हयात असलेल्या साईभक्त सौ. सरोजिनी मुळये यांची भेट घेण्याची सुवर्ण संधी मला लाभली. सर्वजण त्यांना प्रभाताई म्हणूनच ओळखतात.

सौ. सरोजिनी मुळये यांचा जन्म मुंबईमध्ये वांद्रा येथे २ मे १९१० रोजी झाला. बालपण मुंबईत व शिक्षण पुण्याच्या हुजुरबागेत झाले. त्यांचे वडील कै. लक्ष्मण गणेश महाजनी साईभक्त होते. त्यांना सर्व 'काका' म्हणूनच ओळखत. ते साईबाबांचे परमभक्त. सॉलिसिटर दिक्षित, जस्टीस रेगे, रा. गोविंदराव दाभोलकर, गोपाळराव बुट्टी वगैरे त्यावेळचे साईभक्त होते. काका मुंबईहून शिरडीला आले की आठ आठ दिवस तिथे राहात असत त्यावेळेस काका सॉलिसिटर धरमसी जेठा ठक्कर यांचेकडे नोकरीला होते. ठक्कर यांनी जाब विचारला की बाबांनी आज्ञा दिल्याशिवाय मी कसा येऊ असे त्यांचे उत्तर असे. अशा परम साईभक्तांच्या सुकन्या प्रभाताई प्रथम भेटीतच प्रेमळ स्वभावाच्या आहेत असा अनुभव आला. त्यांचा व्यवहार, वागणूक बघून व साईअनुभव ऐकून मी धन्य झालो. माझ्याबरोबर माझे जावई श्रीयुत प्रकाश कर्पे पण होते.

दरवर्षी श्रीसाईलीला लेखक-कवी संमेलनास श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या भाग्यवानांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले जाते ही फार चांगली प्रथा आहे. प्रभाताई लहान असताना खूप वेळा शिरडीला गेल्या होत्या. त्या गेल्या की साईबाबा त्यांना मांडीवर बसवून घ्यावयाचे. प्रेमानी ते त्यांना मैना म्हणत. साईबाबांचा प्रिय घोडा 'शामसुंदर' आरतीच्या वेळेला बाबांना लवून नमस्काराचा मुजरा करतानाही त्यांनी प्रत्यक्ष बघितला आहे. त्या श्रीसाईलीला मासिकाच्या सदस्या व लेखिका आहेत हे सांगायला नकोच.

प्रभाताईंचे लग्न इंदुरच्या सुप्रसिद्ध मुळये घराण्यात सन १९२९ मध्ये झाले. त्यांच्या कुटुंब सदस्यांना वेळोवेळी आलेले साईअनुभव प्रत्यक्ष प्रभाताईंच्या शब्दात असे आहेत.

"इंदूरच्या तोफखान्यातली गोष्ट. माझी मोठी बहीण ताई (माझी जाऊ पण कारण आम्ही बहिणी बहिणी एकाच घरात दिल्या गेलो आहे) त्यावेळी एक-दीड वर्षांपासून सतत अंथरुणाला खिळल्या होत्या. आमच्या सूनबाईंनी देवराम नोकराची बायको 'लाडीबाई'ला रात्री ताईजवळ बसायला सांगितले. लाडीबाईंनी रात्री सर्व दारे-खिडक्या बंद करून घेतल्या. ताईबरोबर लाडीबाईलाही चुकून झोप लागून गेली. रात्री अडीचच्या सुमारास लाडीबाईची झोप उघडली. तो समोर एक पांढरा दाढीवाला वृद्ध माणूस ताईंचे पाय चेपताना दिसला. त्या माणसाने डोक्याला पांढरा कपडा बांधलेला होता. क्षणभर लाडीबाई घाबरून गेली. तिला आश्चर्य वाटले की दारे खिडक्या बंद असताना हा परपुरुष खोलीत कसा काय शिरला आणि ताईंच्या अंगाला स्पर्श का करीत आहे. कसेबसे तिच्या तोंडातून शब्द निघाले—आप कौन हो। उत्तर मिळाले—मुझे साईबाबा कहते हैं। थोड्या वेळात तो वृद्ध माणूस अदृश्य झाला. बिचाऱ्या लाडीबाईला आजपर्यंत माहीत नव्हते की साईबाबा कोण आहेत. घाबरत घाबरत लाडीबाईने आमच्या सुनबाईला विचारले—ये साईबाबा कौन हैं? तेव्हा सुनबाई म्हणाली—तू ये बात क्यों पूँछ रही है? नंतर लाडीबाईने रात्री घडलेला पूर्ण वृत्तांत सांगितला. दुसऱ्या दिवशी ही हकीकत मी जस्टीस रेगे यांना सांगितली. तर ते म्हणू लागले, तुम्ही आणि ताई दोघेही फार भाग्यवान आहांत. काका महाजनी व त्यांच्या दोन्ही सुकन्यांवर प्रत्यक्ष साईबाबांचा वरदहस्त आहे म्हणून हे असे घडले. जस्टीस रेगे हेही परम साईभक्त होते. एकदा त्यांच्या मित्राने (डॉ. गोसावी) त्यांना जवळच्या नाथमंदिरात (इंदौरमध्ये) चलण्याचा आग्रह केला. मंदिरात गेल्यावर त्यांना नाथमाधवांच्या ऐवजी प्रत्यक्ष साईबाबांनी दर्शन दिले. ही गोष्ट खरी आहे की,—जया मनीं जैसा भाव तया...

१९२३ सालची गोष्ट. माझे यजमान भास्करराव मुळये आपल्या सासऱ्यांना ( काका महाजनींना ) सोडायला मुंबईला जात होते. सासऱ्यांच्या आग्रहावरून प्रथम आम्ही शिर्डीला आलो. स्नान, पूजा, जेवण आटपून आम्ही मुंबईसाठी निघणार तोच साईबाबांनी काकाना दृष्टांत दर्शन दिले, व सांगितले—जातोस कुठे, तेथे तुझा काळ वेशी वर टांगला आहे, उद्या जा. काकांनी त्या दिवशी जायचा कार्यक्रम रद्द केला, मग दुसऱ्या दिवशी आम्ही सुखरुप मुंबईला जाऊन पोचलो. ह्याप्रकारे अनेक वेळा आमच्या वडीलांना श्री साईबाबांच्या दृष्टांत दर्शनाचा अनुभव लाभला.

माझ्या लग्नामध्ये सोन्याचे एक साईबाबांची मूर्ति कोरलेले लॉकेट बक्षीस ( उपहार ) म्हणून आंदण आले. मी ते लॉकेट दागिन्यांच्या पेटीत ठेवून दिले काही वर्षानंतर माझ्या मनात आले की पेटीत पडलेल्या सोन्याचा उपयोग माझ्या बांगड्यात झाला तर साईबाबांचे सोने नेहमी माझ्या अंगावर राहील. मग काय, मी ते लॉकेट सोनाराला दिले. सोनाराने मला न विचारता ते लॉकेट दुसऱ्या माणसाला विकले. मला सोनाराचा भयंकर राग आला. माझ्यामुळे माझ्या घरचे साईबाबा बाजारात विकले गेले होते. मला स्वतःवर पण फार राग येत होता. किती दुर्दैवी होते मी. दोन-तीन दिवसानी माझे यजमान ऑफिसमध्ये गेले. त्यांनी सहज आपल्या टेबलाचा खण उघडला तो त्यांना साईबाबांची मूर्ति कोरलेले तसेच लॉकेट सापडले. अंतर एवढेच होते की लॉकेटच्या दुसऱ्या बाजुला मारुतीची मूर्ति कोरलेली होती. माझे यजमान मारुतीचे उपासक आहेत. घरातून गेलेले लॉकेट साईबाबांनी एकदा पुन्हः परत दिले, असे समजून आता आम्ही रोज त्याची पूजा करतो. संकटसमयी साईस्तवन केल्यास बाबा धावून येतात व संकटहरण करतात ही गोष्ट खरी आहे. लॉकेटचा दुसरा अनुभव आला तो असा...

रीवा ( म. प्र. ) येथून मुंबईला जायचे असले म्हणजे सतना येथे जावे लागते. तेथून मुंबईसाठी एक्सप्रेस ट्रेन मिळते. रीवा ते सतना ३५-४० मैलाचा प्रवास आहे. थोडे फार दागिने जवळ घेऊन मी, माझी मुलगी व एक नोकर असे तिघे जण रीवा मोटरस्टॅण्ड वरून सतनासाठी बसलो. मोटरमध्ये ड्रायव्हर-कण्डक्टर मिळून आम्ही एकूण पाच जण होतो. आमची मोटार जंगलात अचानक बिघडली. अनोळख्या जागी तीन परपुरुषांबरोबर आम्ही दोन स्त्रीयाच होतो. आम्हाला फार भीती वाटू लागली. दागिन्यांचा जरी इनशुरन्स होता तरी इज्जत अब्रूच्या रक्षेसाठी मी लॉकेटला हात ठेवून बाबांच्या नावाचा जप करू लागले. खरोखर बाबांनी आम्हाला संकटातून मुक्त केले. बिघडलेली मोटार एकदम सुधारली व आम्ही सतनाला सुखरुप येऊन पोहचलो.

भेट आटोपून आम्ही त्यांचे चरणस्पर्श करून निरोप घेतला. साईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तीविषयी बोलत असताना दोन तास केव्हा निघून गेले, काहीच कळले नाही.

☆



[ साकुरीच्या श्रीसती उपासनी कन्याकुमारी आश्रमाच्या सध्याच्या संचालिका, ।राष्ट्रातील अध्यात्मिक क्षेत्रातील दिव्यविभूती, काव्यलेखनाची सततची आवड, वन, लेखन, मनन व चिंतनात सदा मग्न.]

# श्री साई दर्शन

साईनाथ सद्‌गुरू । विश्वाचा आधारू । भक्तिकल्पतरू भक्तविसावा ॥ धृ ॥
सांईनाम तारक । चराचर व्यापक । घेतां जाय पातक । जन्माचिया ॥ १ ॥
शिरडीग्राम गोदातिरी । वाटे अमरपुरी । वसे साई दरबारी । सिंहासनीया ॥२॥
होतां सांईदर्शन । भक्त आकर्षण । लोहचुंबकासमान । मनाचिया ॥ ३ ॥
सांईचा फकिरी बाणा । कार्य करी अयोध्याराणा । नसे द्वैताद्वैत जाणा ।
सप्तरथाचिया ॥ ४ ॥
सांईनाम कीर्ति । देशविदेशी धरती । अस्त न पावे गभस्ती । ब्रह्मांडाचिया: ॥५॥
सांई ही भक्तांची आई । बालके दुरुनी येती ।
सुखदुःखे सांगती पायी । वात्सल्येचिया ॥ ६ ॥
सांईउपासनी एकरूप । वंदूनी अबला तद्रूप ।
सोडोनिया जगव्याप । स्थीर चरणाचिया ॥ ७ ॥

**प. पू. श्री गोदावरीमाताजी कन्याकुमारीस्थान, साकुरी**

[स्वामी श्रीसंजयानंद,—जन्म कोकणात, महाराष्ट्रीयन असूनसुद्धा हिमाल्या राहून जप-तप आणि योगसाधना यांमधे दंग, काव्यलेखनाची भारी आवड. मराठी हिंदीत श्रीबाबांच्याविषयी कविता प्रसिद्ध. पत्नी सौ. मीरा संजयानंद या पण उत्त गातात.]

# धावरे साई माझ्या

(चाल—उँची उँची दुनिया की दिवारें— नागिन)

कोस कोस मी चालूनी आलो ऐकूनी तुझे नांवरे
धांवरे साई माझ्या हांकेला तूं धांवरे...॥ धृ. ॥
काम धामही कांही सुचेना
मन माझे हे कोठे लागेना
अंतरी नांव तुझें दर्शना विना राहवेना
रुप अनोखे हे तूं दावरे तू दावरे
धांवरे साई माझ्या...॥ १ ॥
ध्यानी मनीं शिरडी साई
तुझ्या विना मज कोणी नाही
संजयाचे मस्तक चरणीं आशिर्वाद तुझा साई
अंत नको पाहूं तू आता धांवरे
धांवरे साई माझ्या...॥ २ ॥

—श्री स्वामी संजयानं
ऋषीकेश, हिमाल

## पुण्याहून श्रीसाईबाबांची पालखी

● श्री सद्‌गुरु साईनाथ कृपामठ स्वारगेट पुणे येथून श्री साईबाबांची पालखी १२-१२-८० रोजी सकाळी ७-३० वाजता पुणेकर भक्त मंडळींच्या समवेत निघाली व ती १ जानेवारी १९८१ रोजी शिर्डी क्षेत्री पायी वाटचाल करीत करीत पोचली. वाटेत भोसरी, कुसळी, नारायणगाव, निमगाव जाळी राहाता, साकुरी इ. ठिकाणी या पालखीचे तेथील भक्तमंडळींनी खूप स्वागत केले व पालखी बरोबरच्या भक्तमंडळींची पण चांगली सोय केली.

[ पुण्यातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ, अध्यात्मिक विषयावर नियत कालीकातून सातत्याने लेखन, नामयोगी, साईनाथ इ. सहा संत चरित्रे शिवाय बाबांची तीन तासात वाचून होईल अशी छोटी पोथी प्रसिद्ध. वाचन, लेखन, मनन, चिंतन यात सदैव दंग. ]

# तुम्ही संतजन

तुम्ही संतजन, जनी जनार्दन
आम्हा न याचे भान
हिरा—कोळसा एकच आम्हा
दिसता उघडी खाण ॥ ध्रु० ॥
जन्म कोणत्या देशी, अथवा
याती हीन महान्
नामनिशाणी ना उरलेली
सर्वच कोरे पान ! १
आकाश टाकी तुम्हास खाली
झेली भूमि, रान
झोळी कांखे, अलख निरंजन
हेचं कुळाचें दान ! २
भूमी आसन, नभ आच्छादन
ओठीं प्रभुगुणगान
तेचं जगासीं दिले वाटले
उरले मग प्रस्थान ! ३

—प्रा. र. श्री. पुजारी

रमानिवास, ९९२ सदाशिव, पुणे ३०

## शुभविवाह

● साईभक्त श्री. प्रभाकर सावंत यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. देवेंद्र उर्फ दिलीप यांचा विवाह श्री. रामभाऊ ढोले यांची कन्या पुष्पा इजबरोबर शनि. ता. ३-१-८१ रोजी स्काऊट पॅव्हेलियन हॉल वीर सावरकर मार्ग शिवाजी पार्क दादर येथे साजरा झाला. वधूवरांना आमचे शुभाशिर्वाद.



डॉ. विनायक गो. दुर्गे 'दुर्गेश' प्रथितयश कवी व चिंतनशील लेखक. मराठी, हिंदी, संस्कृत मधून विपुल लेखन, विवि विषयावर १४ पुस्तके प्रसिद्ध 'अध्यात्मिक तत्वकवी' म्हणून मान्यता व महाराष्ट्र शासना कडून जाहीर सत्कार. यांचेकडून दरवर्षी मराठीतील सर्वोत्कृ काव्यसंग्राहास ५०१ रु. चे डॉ. कवी दुर्गेश पारितोषिक देण्यात येते.

# सुखदुःखाचे अभिन्न मीलन !

सुख दुःखाचे अभिन्न मीलन !!
नको मानवा सुखही शाश्वत
नको मानवा दुःखही शाश्वत
सुखदुःखाचे परि वाटे नित
असो जीवनी मधु सम्मीलन ! सुखदुःखाचे अभिन्न मीलन !!
दुःख जीवनी आन्हिक जेवण
सुख परि भासे मधुमय भोजन
सुखदुःखाचे शाश्वत मीलन
करते उज्ज्वल मानव-जीवन ! सुख दुःखाचे अभिन्न मीलन !!
पीडित हे जग अति दुःखाने
पीडित हे जग अति सुखाने
सुखदुःखाचे मित परिमाणे
असो जीवनी योग्य विभाजन ! सुख दुःखाचे अभिन्न मीलन !!

—डॉ. विनायक गो. दुर्गे, दुर्गेश
सौजन्य, धरमपेठ विस्तार नागपूर-१०



डॉ. सौ. सुमती खानविलकर, लोनावळयाचे हसरे व्यक्तिमत्व, तेथील डॉक्टर. बाबांवर गाढ निष्ठा. त्यांच्यावरच सारा भार सोपवून आपल्याकडे येणाऱ्या रोग्यांवर उपचार. सदैव साईचिंतनात मग्न. मीरेप्रमाणे संपूर्ण जीवन श्री बाबांच्याच भजन पूजनात व्यतीत करण्याची मनिषा. डॉ. इंदू व डॉ. सुमन यांची बाबांनी गाठभेट घडवून प्रगाढ मैत्री जोडली.

# शरणांगती

दे द्यावा शरणांगता साईनाथा
शरण शरण तुज भगवंता
कसले हे जिणे केविलवाणे लाजिरवाणे
नुरली संसाराची आस नुरला सुखाचा भास
लागली साईनाथा तुझीया भेटीची आस
नको नको हा वनवास
काय सांगू कसे सांगू किती सांगू दीनानाथा
भरल्या संसारी अनाथ मी बनले साईनाथा
विटले जगा विटले संसारा माझा मीच मांडीला पसारा
घाण्याच्या बैला नसे माहित वाट असाच माझा झाला थाट
बैला दाविली पेंडी बैल फिरे दिनभरी
मीही आशेची पेंडी धरूनी फिरते संसारी
कैवारी माझा तू साईनाथा शरण शरण तुज सुमन आता
करू नको कधी दूरी धावूनी येरे सद्‌गुरु साईनाथा

—डॉ. सुमती खानविलकर
सीताकुंज, लोणावळा

[डॉ. वसंतराव पात्रीकर-बिलासपूर येथील प्रसिद्ध डॉक्टर. मातृभाषा मराठी पण हिंदीतून शिक्षण व हिंदी प्रदेशातच वास्तव्य. श्रीसाईबाबांचे भक्त होमिओ-पॅथिक मेडीकल असोसिएशन ऑफ इंडियाचे सदस्य.]

# शिर्डीच्या वाटेला जाऊ या

(तर्ज—मामाच्या गावाला जाऊ या)

शिर्डीच्या वाटेला जाऊ या,
साईच्या पायाला लागू या ॥ धृ ॥
गोरी गोमटी मूर्ति अशी,
उजळ चांदणी दिसते जशी।
वर्णू न शकती शेष ही राया,
शिर्डीच्या वाटेला जाऊ या ॥ १ ॥
भव मायारी दुःखे भारी,
येते वरच्या वरचे वरी।
निरसन व्हाया लाग तू पाया,
शिर्डीच्या वाटेला जाऊ या ॥ २ ॥
सगुण भक्ति असे रे सोपी,
मुकुंद पायाला भजुन गोपी।
मोक्ष पदाला प्राप्त कराया,
शिर्डीच्या वाटेला जाऊ या ॥ ३ ॥
भक्तजनांचा तो कैवारी,
कलियुगी हा असे अवतारी।
पयोधर जीवन कर्म सराया,
शिर्डीच्या वाटेला जाऊ या ॥ ४ ॥

—डॉ. वसंत दिवाकर पात्रीकर
रोडी मार्ग, गल्ली नं. १ टिळकनगर
बिलासपूर (मध्यप्रदेश)



डॉ. सौ. मालती राहाटे-भंडारा येथील सरकारी रुग्णालयातील डॉक्टर बाबांच्यावर अपरंपार भक्ती व निष्ठा. आपल्याकडे येणाऱ्या रोग्यांना अतिशय सौजन्याची वागणूक देतात व बाबांच्या नामस्करणाचा महिमा प्रसंगी सांगतात.

## वंदना

जोडीयले कर विनम्र माथा,
  वंदन तुजला साईनाथा ॥ धृ० ॥
तव प्रतिमेचे दर्शन घेते
  भावभक्तिने तुला पूजीते
स्फूर्ती येते गाता गाथा
  वंदन तुजला साईनाथा ॥ १ ॥
श्रद्धा सबुरी तुमचे देणे
  तव कृपेचे अपूर्व लेणे
लेणे अलंकार माथा,
  वंदन तुजला साईनाथा ॥ २ ॥
भस्म उदीचा प्रसाद तुमचा
  ठेवा आहे तो शांतीचा
चिंता नसावी चित्ता
  वंदन तुजला साईनाथा ॥ ३ ॥
भावभक्तिने उदी सेवीता
  मुक्ती मिळते व्याधीग्रस्ता
या जगताचा तूची त्राता
  वंदन तुजला साईनाथा ॥ ४ ॥

—डॉ. सौ. मालती राहाटे, सरकारी दवाखाना, भंडारा

[सौ. उषा प्रभाकर अधिकारी, रत्नागिरीच्या साईभक्त कवयित्री. व्यवसायाने शिक्षिका. गद्य व पद्य लेखनाची सारखीच आवड. विशेषतः गद्य कथारूप करून त्यातून बाबांची शिकवण ध्वनीत करतात. आपल्या सर्व कन्यकांनाही उच्च शिक्षण देऊन त्यांनाही साई भक्तीचे पाठ देतात.]

# ऐसे करा !

श्रीसाईसमर्थ महामंत्र । जपा जन हो अहोरात्र
तेणे होतील पुत्रपौत्र, सुखी जीवनी ।।
नित्य साईचे घ्या नाम । परि ठेऊनी मन निष्काम
साई देतील सुखधाम, जन्मोजन्मी ।।
शिरडीचीच करा वारी । तेथे अपुला साई श्रीहरी
दैन्य, दुःख, आपदा हारी, सुखी करील ।।
वाचा साईचे चरित्र । व्हाल परम पवित्र
दिसे सुखाची दिनरात्र । भक्ता तुम्हा ।।
परममंगल माझा साई । प्रेमवत्सल सुखदायी
काय वानू मी नवलाई, अज्ञ पामर ।।
मी तर मूढ मंदमती । कुठली मज काव्य व्युत्पत्ती
सर्व बाबाच वदविती । निमित्त मी ।।
मी बाबा घरीचे श्वान । त्यांचे पायीची वहाण
लेकरू दीन अजाण । सेवा करी ।।

—सौ. उषा अधिकारी
सावित्री भुवन, बंदररोड रत्नागिरी.

## सौ. मालतीदेवी मुळे साईचरणी विलीन

नासिकच्या लेबर कोर्टाचे माजी न्यायाधीश श्री. एम. व्ही. मुळे यांच्या पत्नी साईभक्त सौ. मालतीदेवी मुळे या दीर्घकालीन आजारानंतर रविवार ता. २१-१२-८० रोजी (दत्त जयंती) रात्री ९-२० वाजता अहमदनगर येथे साईचरणी विलीन झाल्या. शिरडीस बरेच दिवस त्यांचे वास्तव्य होते व त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे शिरडीस त्या बऱ्याच लोकांना "मुळे बाई" नावाने परिचित होत्या.

ईश्वर मृताचे आत्म्यास शांती देवो.



डॉ. कु. इंदूताई नाईक – लोणावळयाच्या सुप्रसिद्ध डॉंक्टर, तेथील मुक्ता नर्सिंग-होमच्या चालिका, पुणे–सातारा मार्गावर असलेल्या दत्तात्रय इंडस्ट्रीजच्या मॅनेजिंग डायरेक्टर श्री साईबाबांवर गाढ निष्ठा आणि भक्ती बाबांच्यावरच काव्य लेखन.

# दर्शन

दर्शन व्हावे बाबा साई
    वाटे मज तव दर्शने पाप निघूनी जाई

गळा पाश प्रपंचाची दोरी
    मी अडकळे संसारी
समजूनी उमजूनी पाशसुटेना
    आशा निराशेचा खेळ मिटेना

हे कां पाप गत जन्मीचें
    म्हणूनी सुटेना बंधन याचे
नाम तुझे घेता घेता
    मुक्त होईन जाता जाता
ह्या जन्माते करि उतराई
    दर्शन दे बाबा साई

—डॉ. इंदू नाईक
सीता कुंज, बॉंबे पूना रोड,
लोणावळा

[श्रीसाईबाबांचे अनेकदा दर्शन सौख्य घेतलेले महाभाग्यवान भक्त. कोल्हापूरचे निष्णात डॉक्टर. बाबांच्यावर लेखन, काव्य इ. काही नाटकांची पुस्तकेही प्रसिद्ध.]

# कवी-लेखक संमेलनाची फलश्रुती ?

साई समर्था, जगत् त्राता,
धाव वेई सत्वर ।
राष्ट्र पडले संकट मारा;
करी तयाचा उद्धार ॥१॥

स्वार्थाचाने द्वेष बुद्धिनें
पडला बंधुत्वाचा विसर ।
ऐक्य लोपले, सत्य पळाले,
प्रगटे सूडभावना प्रखर ॥२॥

गरीबावाली, दलितासाठी,
न कोणी ये संकट काळी ।
साईवीण दुसरी, न मिळे ओसरी,
शिर्डी एकच सावली ॥३॥

भक्तांचा मेळा, करिती सोहाळा,
कवी-संमेलन द्वारा ।
धर्मातित देव, शिरडी गांव,
देई सकला आसरा ॥४॥

दुःखाची ओझी, ठेविती खाली,
विसरती संसार पसारा ।
मिठ्या घालती, कविता गाती,
श्रवती प्रेमाश्रूंच्या धारा ॥५॥

कौटुंबिक बंध जडती अर्निबंध,
थबथबे मायेचा ओलावा ।
फलश्रुती ! साई पदी,
अखंड राहो गोडवा ॥६॥

—डॉ आर. एस. कापडी
साई प्रसाद, राजारामपुरी १३वी गली,
कोल्हापूर




श्री साईलीलाचे कार्यकारी संपादक सदानंद चेंदवणकर यांच्या पत्नी मराठीतून अध्यात्मिक साहित्य वाचनाची भारी आवड. परमेश्वरावर निष्ठा. एकाकाळी मुंबापुरीतील विविध नामांकीत इस्पितळातून रोग्यांची सेवा सुश्रुषा करण्याची नोकरी. बाबांवर गाढ भक्ती.

# श्री साईध्यान

सुंदर ते ध्यान बैसे शिळेवरी
कर उंचावुनी शांती देई ॥
नसे भेदभाव, नसे उच्चनीच
सर्वाठायी प्रेम एकचित्ते ॥
ऐसी माझी माऊली साईनाथ आई
येई येई वेगे चरणी ठाव देई ॥
गोड तुझे रुप गोड तुझे ध्यान
देई मज प्रेम सर्व काळ ॥
साई माऊलीये हाची वर देई
संचरोनी राही हृदयी माझ्या ॥

—सौ. तारा चेंदवणकर
राधा माधव १२०।४०५५ टिळकनगर,
मु. पो. चेंबूर, मुंबई ४०००८९.



प्रा. गुंडेराव पटवारी—बिदर. आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध शहरी असलेल्या एन. एफ. जे. महाविद्यालयात राष्ट्रभाषा हिन्दीचे प्राध्यापक. श्रीबाबांवरच 'काय पण कोण-याही विषयांवर क्षणभरात शेर किंवा काव्य करण्यात सिद्धहस्त. अत्यंत साधी रहाणी, नम्रता, ऋजुता इ. गुण अवश्य घेण्यासारखे.

# श्री राधाकृष्ण स्वामी

तेरे नाम में राधा भी, कृष्ण भी,
तेरी सादगी में साई कि, चमक भी,
तुझे देखते हुवे मैं, देखते ही रह गया,
तेरे दर्शन कि आस, रह गयी है अभी ॥ १ ॥

देख कर एक शांती कि झलक पा गया हूँ,
बोलकर तुम से साई कि जिन्दगी पा गया हूँ,
कबीर, तुलसी, मीरा का त्याग देखा है तुझ में
तेरे चरणों में साई के चरण पा गया हूँ ॥ २ ॥

तुम जिओ, तुम्हारे जिने में हमारी जिन्दगी है,
तुम रहो, तुम्हारे रहने में साई कि जिन्दगी है,
राधा कृष्ण भी साई ही बन गया है यारो,
उनके दर्शन में, साई की सदा खत ही है ॥ ३ ॥

—प्रा. गुंडेराव पटवारी
एन. एफ. जे. कॉलेज, बिदर (कर्नाटक)



सौ. मीना खाडिलकर–मराठी व हिंदीतून श्री बाबांवर सुंदर काव्य लेखन.

# श्री साई, मांग रहे आशिष,

पूनीत कार्यको शक्ति मांगते
हम नवा कर सीस ॥ धृ० ॥
भाव फूलों की, साईलीला,
गद्य–पद्य की सुगंधी माला
उन्नतिका सुपथ दर्शन, स्वयं–साई सन्देश ॥ १ ॥
भावभक्तिका, सुह्रद्य दर्शन,
'साईलीला' का, श्रद्धा प्रगटन,
अमर लता को अमृत सींचन, आशिषोंकी बारिश ॥ २ ॥
स्वयं करे जगदीश,
आंग्ल-मराठी भाषा हिन्दी, साईलीला की सुहाग बिन्दी,
भाषा धर्म की अद्वैत मूर्ति, स्वयं साई जगदीश ॥ ३ ॥

卐 ॐ 卐

— सौ. मीना पां. खाडिलकर
आराधना, श्री महालक्ष्मी



मुंबई पोर्ट ट्रस्टमधे (डॉक्सखाते) ऑफिस सुपरिटेंडच्या हुद्यावर. नियतकालिकातून लेख व कविता प्रसिद्ध. कोकणातील अनेक संस्थातून सामाजिक कार्य, कोकणदर्शनचे काही काळ सह-संपादक. आदिशक्ती भवानी माता हे पुस्तक प्रसिद्ध. श्रीसाईजीवनावरील काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित.

# साईलीला

'साईलीला' मासिक साधन साई सेवेचे
सेतू होऊनी आज राहिले अनेक भक्तांचे ॥ १ ॥

सदानंद हे देती अंक, साईभक्तांना
साई प्रचिती, अनुभव प्रीती, मिळे वाचकांना ॥ २ ॥

वाडे कोडे लिहिवी, रचिती, जे जे भक्तजन
त्या भक्तांचे भरविती साई शिरडी संमेलन ॥ ३ ॥

प्रसाद आशिस मिळे सर्वही, कवीलेखकांना
साई आई, प्रेमछत्र हे, सर्वच भक्तांना ॥ ४ ॥

—श्री. दा. र. दळवी
५।७८, बी. पी. टी. कॉलनी
रेनॉल्डस रोड, वडाळा, मुं. ४०००३७



श्री. रमाकांत नागेश पंडित, मूळ सावंतवाडीचे, आयुर्विमा विभागात टंक लेखक पदावरून सेवानिवृत्त वय ६८ वर्षे. मुंबापुरीच्या महापौरांच्या हस्ते सत्कार, मांगल्याची ज्योत हे काव्य पुस्तक प्रकाशित रामरक्षा, दासबोध, रामायण, गणपती अथर्वशिर्ष, श्रीसाईसच्चरित्र, स्तोत्रे, अभंग गुरुचरित्र इ. ग्रंथ चांगल्या कागदावर स्वहस्ताने लिहून ते पत्र रूपाने बाबांना अर्पण करणार पत्राची एकूण लांबी दिड मैल व शब्द सव्वा लाख. संत चित्रांचा संग्रह.

# साई मजला दे रे दर्शन

साईप्रभू मजला दे रे दर्शन
जोडूनी हात करीतो तुला नमन
होऊनी तुझाच भक्त अती लीन
विनवीतो तुला साई रात्रंदिन
भगवी वस्त्रे करूनी परिधान
साईप्रभू दिसे देदीप्यमान
घेऊनी डोक्याखाली वीट लहान
हिंदोळ्यावर झोपे तो भगवान
आजानुबाहू साई मूर्ती महान
ठेवी कृपा सर्वांवरी समान
भगवा कपडा माथी बांधून
दिसे मूर्तीमंत वैराग्याचे ध्यान
उजळून दीप ते प्रकाशमान
दीपवूनी टाकी द्वारकामाई छान
जिथे असे साईचे वसतीस्थान
ती भूमी शिरडी झाली पावन
साईप्रभू मजला देरे दर्शन
जोडूनी हात करीतो तुला नमन

—श्री. रमाकांत पंडित, प्रभा स्मृती, भाऊ दाजीमार्ग माटुंगा, मुंबई ४०००१९

[ अहिराणी भाषेतून श्रीसाईगीते रचणाऱ्या व म्हणणाऱ्या साईभक्त कवयित्री. ]

# आमी साईना लेकरे

( अहिराणी गीत )

आवडे जी। साईनाम आवडे
मन कोठे जडे। माले समजेना ॥

आवडे जी। साईनाम आवडे
जिवले नावडे। बोलन चालन ॥


आवडे जी। साईनाम आवडे
मन मन्ह गडे। शिरडी जावान ॥

आवडे जी। साईनाम आवडे
दारका मायडे। तुन्ह नांव लेवू ॥

आवडे जी। साईनाम आवडे
शिरडी चावडे। न्याय कोन करे ॥

लीला म्हने बारे। आमी ते लेकरे
वनू तुना दारे। भेट दे एकदा ॥

—सौ. लीला मराठे
राठी बंगला, साक्री रोड,
मु. पो. धुळे



विविध नियतकालिकातून कथा, अध्यात्मिक दर्जाच्या मासिकातून खास करून श्रीसाईबाबांच्यावरच लेखन. बाबा आराध्य दैवत. कथा-कादंबऱ्या व काव्यसंग्रह प्रकाशित. लेखनाची दांडगी हौस.

# साईपंथी वेडे आम्ही

साईपंथी वेडे आम्ही
साईपंथी वेडे ॥ ध्रु. ॥

पत्थर डोईखाली निजाया धरती
चटणी भाकर साथी, क्षुधा शमविती
निर्झर झुळूझुळू, दे जल गोड गोडे
साईपंथी वेडे आम्ही, साईपंथी वेडे ॥ १ ॥

सुख समाधान शांती अन चित्ती
झोळी अमुची नसे, कध्धीच रिती
घराची अमुच्या सदा, उघडी कवाडे
साईपंथी वेडे आम्ही, साईपंथी वेडे ॥ २ ॥

पैसा अडका नको, नको स्वार्थवासना
गाडी बंगला आणि भोग साधना
कुणी वंदा, निंदा अम्हा न त्याचे वावडे
साईपंथी वेडे आम्ही, साईपंथी वेडे

—श्री. विजय द. हजारे, एम. ए.
सी।६, गुंफादर्शन, फर्स्ट क्वार्टर रोड
बोरीवली पूर्व मुं. ४०००६६



[ साईभक्त डॉ. सुमती खानविलकर यांच्या कन्या. बाबांच्यावर काव्यरचना करण्याची आवड. ]

# साई भक्ती

साईबाबा तव मूर्ति दिसे मम नयना सामोरी ॥ १ ॥
गहिवरूनी मम आले अश्रु दाटले नयनी
हाक मारता बाबा अंतरी मी ॥ २ ॥
साद दिलीत त्या हाके आलात धावुनी
मज सन्निध उभे मानव रूप घेऊनी ॥ ३ ॥
होते मी तळमळत जीवन-मरणाच्या वाटेवरती
स्वहस्ते सोडवीलेत मज संकटातुनी ॥ ४ ॥
दिधला प्रसाद तुम्ही माझिया ओटी
नाम तियेचे ठेविले बाबांची भक्ती ॥ ५ ॥
साईबाबा असती माझे कैवारी
काय उणे मग मज या संसारसागरी ॥ ६ ॥
साईबाबा काय सांगू तुमची कृपा तरी
सुनीता म्हणे तुझी थोरवी गाण्या वाणी पडे अपुरी ॥ ७ ॥

—सौ. सुनिता विचारे
दयानंद सोसायटी ब्लॉक नं. ५
गोपाळनगर कल्याण रोड, डोंबिवली

[श्री साईबाबांच्यावर लहानपणापासूनच प्रेम. त्यांच्यावर काव्यधारा स्वतःच्या नावावर दोन चार काव्यसंग्रह प्रकाशित. हळूवार काव्यरचना हे काव्यरचनेचे वैशिष्ट्य.]

# आरती


टाळ मृदुंग पखवाज आणा
आरती गाऊ या साईराणा ॥ धृ. ॥

षड्‌रिपूंचा जाळूनि कर्पूर
पंचप्राण ज्योत धरूनि
ओवाळू चरणा ॥ १ ॥

सद्‌गुणांची फुले वेचूनि
सद्‌भावांचा नैवेद्य ठेवूनि
षोडषोपचार पूजा अर्चा
काया वाचे मना ॥ २ ॥

प्रसन्नचित्ते आशीस द्यावा
कृपादृष्टीचा लाभ मिळावा
साईप्रसाद माथीं घेता
मुक्ति जन्मवेणा ॥ ३ ॥
आरती गाऊ या साईराणा ॥

—कु. शशिकला साळगावकर
मुक्तानिवास, १५५ ब, नवी पेठ, सोलापूर



धुळ्याचे प्रसिद्ध पत्रकार आणि कवी. साईलीलेतूनच नव्हे तर खानदेशातील अनेक नियतकालीकातून विविध प्रकारचे लेखन प्रकाशीत.

# वाट चालतो शिर्डीची

(चालः बार बार तोहे... फिल्मः आरती)

वाट चालतो लगबग मी शिर्डीनगराची
दर्शन घ्याया ओढ लागली साईनाथांची ॥धृ॥
दिवे पाण्याचे पेटवुनी जगी दाविला चमत्कार
उदी देऊनी बरे केले कितिकांचे आजार
साथ करिती संकटी बाबा दीनदुबळ्यांची
दर्शन घ्याया ओढ लागली साईनाथांची ॥१॥
मनी ठेऊनी भाव जसा...तसा अनुभव
दाविती बाबा निजभक्तांना नित्य प्रभाव
अनेक भक्तां ओळख देती निजसामर्थ्याची
दर्शन घ्याया ओढ लागली साईनाथांची ॥२॥
दीनदयाळू साईमाऊली दत्तअवधूता
आलो शरण तारी मजला तूंची सुखकर्ता
आस अंतरी सेवा घडावी साईचरणांची
वाट चालतो लगबग मी शिर्डीनगराची ॥३॥

—श्री. रमेश डी. चव्हाण
'साईनिकेतन' गुजरलेन, नवापूर जि. धुळे

# व्हावे साईनाथा आता कृपावंत

( गजल )

व्हावे साईनाथा आता कृपावंत
दयाळू अनंता नका पाहू अंत ॥
ना कधी मिळाली सावली सुखाची
अखंडीत कैसा पोळलो उन्हात ॥
दिसती आशेचे मृगजळ सारे
किती पुढे जावे राहुनि भ्रमात ॥
झोप शांत यावी एकदा मनाची
अशी नाही आली रात जीवनात ॥

—श्री. ग. रा. पालकर
२२३।२, दारूवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला, मुं. ४००,०७०

●

[ठसठशीत व्यक्तिमत्व. श्री बाबांच्यावर उत्तमप्रकारचे काव्य लेखन सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या संस्थातून सुमधुर कंठातून गीते सादर.]

# साईभास्कर

दुर दुर क्षितीजावर । देखीला म्या साईभास्कर ।
देखोनिया निर्भर । सुख झाले ॥१॥
भानुतेज अपरिमित । तैसा साई झळकत ।
अज्ञान तमासी छेदन । दिनकरु जैसा ॥२॥
काय सूर्याची प्रभा । वर्णवेना तयाची शोभा ।
केवळ लावण्याचा गाभा । साई माझा ॥३॥
आशा म्हणे हेचि दिसी । भरुनी उरली आदिअंती ।
क्षितीजी मात्र झळकती । साई भास्करु ॥

[विपुल गद्य व पद्य लेखन. गेली कित्येक वर्षे बाबांच्यावर विविध प्रकारचे काव्यलेखन. भारत सरकारच्या हवाई दल कार्यालयात ऑफिस सुपरिंटेंडेंट या पदावर]

# होता साईमय

संसार - सागरी
साईनाम नाव
सोसवील वारे
झंझावाती घाव !.........१

भक्तीचे अंकूर
उगविता मनी
मनीचा संशय
जाई निःसंशय !.........२

साईनाम सोपे
लावा त्याची रोपे
साईनाथ कृपे
काळही न कोपे !.........३

एकनाथ जगीं
साईनाथ माझा
नुरे भव-भय
होता साईमय !........४

—श्री. विनायक पाठक
राजावाडी, घाटकोपर



श्री बाबांच्यावर अतिशय भावनाविवश होऊन काव्य लेखन करणारे तसेच गाणारे हे कवी पुण्यातील एक रिक्षाचालक आहेत.

# लेखक कवीसंमेलन

०००

नाही राहीले भान
सद्‌गुरू तुम्ही किती गुणवान ॥ धृ. ॥
लेखक कवि हे श्रोते जमले
दिला तुम्ही हा मान ॥ १ ॥ सद्‌गुरू ॥
हिरे माणिके चरणी आले
रत्नाची ही खाण ॥ २ ॥ सद्‌गुरू ॥
नाम स्मरण हे तुमचे गाता
वाटे मना समाधान ॥ ३ ॥ सद्‌गुरू ॥
मनी चिंतिले आस पुरविशी
तु आमचा भगवान ॥ ४ ॥ सद्‌गुरू ॥
लहान मोठा भाव नाही
घरशी सर्व समान ॥ ५ ॥ सद्‌गुरू ॥
दत्तू म्हणे साईबाबा
नाही ठेवली वाण ॥ ६ ॥ सद्‌गुरू ॥

—श्री. दत्तात्रय महादेव मोरे
शिवाजीनगर, पुणे

# अंतरीची ओढ

साई तव सगुण मूर्ती
पाहण्या कधी
मिळेल म्हणुनी वाट मी
पाहुरे किती ॥१॥
तव दर्शनाची ओढ फार
मज अडचणी येती फार
साई त्या करी पार
चरणावरी भार तुझ्या घालूरे किती ॥२॥
भक्त तुझा घरी असे
वाट पाहात स्वस्थ बसे
मार्ग त्या सापडत नसे
अंतरीची तळमळ शांत होईल कधी ॥३॥


—श्री. म. द. भिडे ११९५ सदाशिव पेठ पुणे ३०

# — साईधाम —

क्षेत्र शिर्डी आहे साईचे धाम
मुखी घेऊ चला साईनाम
हा निर्धार मनी भक्तिसाठी केला
वसे येथे अयोध्येचा राम ॥धृ॥
साईनामात शक्ती किती
मोह मायेची नाही भीती
येथे वाही हो भक्तिचा पूर
काम, क्रोध पळे दूर-दूर
कृपासागर नाथ, देई सर्वा साथ
लागे साईला, श्रद्धेचे दाम ॥१॥
ब्रह्मा, विष्णू साई महेश्वर
देवांचा देव साई श्रीहर
सर्व धर्मात साई वसे
साई महिमा हा थोर असे
नेईल भव तीरी, सर्वा साई हरी
तारक आहे श्री साईचे नाम ॥२॥

—श्री. डी. बी. जगत्पुरीया मु. पो. शिरूड ता. जि. धुळे

# साई प्रार्थना



साई तू कृपाळू
झाली कृपा तुझी
रात्र गेली माझी
विश्रांतीत

साई तू दयाळू
तुझ्या कृपेमुळे
आता मला मिळे
जेवावया

जगात साऱ्यांना
माझ्याच प्रमाणे
जेवावया देणे
साईनाथा

साई तू प्रतिभा
स्फूर्ती देई मला
काम करायला
भरपूर

साई तू दयाळू
देई आशिर्वाद
प्रवास सुखद
होण्यासाठी

साई तू दयाळू
मागणी क्षमेची
झालेल्या पापांची
दिवसांती

—श्री. ग. दे. कुळकर्णी
'कुलदीप' तांबरी मु. उस्मानाबाद

[बाबांच्यावर भारावलेल्या अंतःकरणाने वाचन व लेखन करतात. पुण्यातील भावे स्कूलमधे छानदार व्यक्तिमत्वाचे शिक्षक.]

# साईनाथ

शिळेवर बसुनी पाहतो विश्वा साईनाथ
माझा सद्‌गुरू साईनाथ ॥ धृ. ॥

सुस्थिर आसन, सुंदर दर्शन
प्रेमाश्रुंनीं भरले लोचन
धवलवसन हा सद्‌गुरूराया भक्तांच्या चित्तात ! १

दृष्टि मनाचा ठाव घेतसे
विकारवादळ पूर्ण शमतसे
विवेकज्योती तेवू लागते मन्मनि खूप प्रशांत ! २

स्मितहास्याने वेड लावले
साई माझे माझे झाले
मी–तूपण मावळले नकळत अद्वय साम्राज्यात ! ३

आश्वासन अनमोल वाटते
कृतज्ञता कंठात दाटते
बोल न सुचती मधुर झिणझिण्या या गात्रागात्रात ! ४

सद्‌गुरू साई दत्त दिगंबर
नाम घोळते या रसनेवर
देहभान हरपते क्षणार्धी दिसते पुढची वाट ! ५

साई साई सोऽहम् सोऽहम्
सद्‌गुरू सद्‌गुरू सोऽहम् सोऽहम्
एकांताची बहुत आवडी, रमते मन विजनांत ! ६

शिरडीला जधि पाय लागले
अपाय सगळे टळले टळले
श्रीरामाचे झुकते मस्तक साई ठेवत हात ! ७

—श्री. श्रीराम बाळकृष्ण आठवले एम. ए. बीएड.
बलवंत सदन, ३४४ नवी पेठ, पुणे ३०

# असतां साईचा कृपाशिर्वाद


असता साई नाम मुखी
संकटे पळती
मने सांवरती
असतां साईचा कृपाशिर्वाद
काय पडेल बाध
सरळ आयुष्यांत
असतां साईचे अभय
कसले मग भय
राहो कृपाछत्र उदंड
ही मनीषा बलदंड

—श्री. उज्ज्वल वामनराव कुलकर्णी

# परमपिता परमात्मा

कृपासागरा करुणाकरा तुझा नसे अंत
संकटनाशक भवहारक तुचि एक भगवंत ॥धृ॥
त्रैलोक्यनाथ तु शांतीसागर
पतितपावन अन् ज्ञानसागर
परमपिता तु परमात्मा तूचि एक महंत ॥१॥
जन्ममरणाचे चक्र फिरविशी
सुखदुःखाशी समरस करिशी
ज्योतिर्बिंदू स्वरुप तुझे करिशी लिला अनंत ॥२॥
ब्रह्मा विष्णु आणि महेश्वर
तीन देवता सगुण साकार
शिवरुप तू परमात्मा तव स्वरुपी मी स्थित ॥३॥

—श्री. बबन डी. येरम
कल्याणजी देवजी चाळ नं. १ रुम नं. ५
चिरागनगर घाटकोपर, मुंबई-८६



धुळ्याचे एक तरूण पत्रकार, विविध नियतकालीकातून प्रासंगिक विषयांवर लेखन गाण्याची आवड, श्री बाबांवर लावणी, गझल, पदे, गीते यांचे अखंड लेखन उत्तम वक्तृत्वशैली.

# अखेरच्या निरोपाची लावणी

मैतर हो दारी आला-मनी रमला खातरदारी झाली अशी
आवं ! आता कवांतरी जायाचंना पटदिशी ।।धृ।।
आली माता-दिसला पिता झालं वासरू बेभान
मनात रूतलं घरात बसलं साई नावाचं की ध्यान
आवं ! डोळे तुमचे झाले ओले. वर आभाळ पडतंय फशी ।।१।।
सायेब आमचे राजा माणूस अचं संपादक सरकार
दोन दिसात दोन जिवांचा हा दिलचा दरबार
तुम्हा सांगतुया खरं वाटलं खोटं मनाची मोठी बात
आवं मनामनात पेटतेया भक्तीची ज्योत ही कशी ! ।।२।।
पाप केली पुण्य केली जरी झाली बेइमानी
आवं ! तुम्ही मनात आणा खाली वर ध्यानात येईल गाणी
कुणी माय मिळाली, मैय्या आली भैया झाला खुशी ।।३।।
मी चुकेल कोकरू गरीब छोकरू
तुमचंच की हो लेकरू
माय तुम्हीच अन् बाप तुम्हीच मग इह कोठं मी घर
आता डोळ्यांत येईल सरसर झरझर
अश्रू पडतील फशी
आवं आता कवांतरी जायाचंना पटदिशी ।।४।।

—श्री. जगदीश देवपूरकर 'सुलोच' २६४३/५ धुळे



[• एक उत्कृष्ट चित्रकार] आणि [गायक, बाबांवर [कविता] करण्याची आवड [पुण्यातील सुदर्शन केमिकल कंपनीत नोकरीस.

# भाव भोळ्या भावनांचा

(चाल : भावनांचा तू भुकेला श्रीहरी–सुमन कल्याणपूर)

भाव भोळ्या भावनांचा तू भुकेला साई रे ऽ ऽ
भक्ती भावे अर्पीता । तुज रान फुलते चालते ऽऽ
अंतरीचे भाव फुलता । आसवांचे हास्य होते ।
कातळाला स्पर्श होता तोही वदतो साई राऽऽम ॥ १ ॥

उच्छिष्ट बोरे भिल्लीणीची । भक्तीभावे चाऽऽलती ।
प्रेम भावा अर्पिता तुज । वक्षीलत्ता चालते ।
नाम तुझे वदनी राहो । प्रार्थना ही साईरामा ॥ २ ॥

—श्री. बी. व्ही. लांजेकर
स्वारगेट, पुणे

# १ वंदूया श्री साईनाथा

वंदन करण्या श्री साईंना,
प्रणाम करण्या या महासंताला,
चला जाऊया शिरडी क्षेत्री ॥

साई कृपा झाली आता, शिरडीस जाऊ,
नाथ दर्शन घेऊनिया उदी भाळी लाऊ ॥

साईनाथ मनी–साईनाथ ध्यानी
दुजा देव नाही माझ्या चिंतनी ॥

# साई महिमा

साईनाथा पहावया मती माझी झाली
श्रीसाई सत्‌चरित्र ऐका या वाचा श्रद्धा भक्तीभावाने,
जाईल मी–तू पणा साई पारायणाने ।
प्रभो लाभो नित्य साईप्रेम कामना,
पुरवावी मधुकराची गोड ही वासना ॥

—श्री. मधुकर सी. मंडलीक
टेलिफोन ऑपरेटर सराफ गल्ली,
नवापूर जि. धुळे नवापूर ४२५४१८

# निरोप



निरोप क्षण हा समीप आला, निरोप घ्यावा कसा ।
कासाविस तो प्राण जसा तो जलाविण मासा ॥ धृ० ॥
साई आमुची मायमाऊली, ।
आम्ही बालके तिची चिमुकली ।।
करुनिया स्तनपान निघालो आमुच्या निजवासा ।। १ ।।
माहेराहुनि जशी निघावी कन्या ही सासरी ।
शिरडीतुनिया तसे निघालो उतरूनि ही ओसरी ।।
पुनः पुनः परि वळुन निहरतो मंदिरच्या कळसा ॥ २ ॥
व्यथावेदना दैन्य संकटे । दुःख सांगती थोर धाकुटे ॥
अभय मिळे त्या सर्वेच येथे सकलांना सरसा ॥ ३ ॥
'सबका मालिक एक हैं, सब उसके संतान ।
श्रद्धा सबुरी प्रेमभावसे, अपना वो भगवान ॥'
मानवतेचा आम्ही घेतला, अपुला दिव्य वसा ॥ ४ ॥
येतो आम्ही परंतु बाबा, परत आम्हा बोलवा ।
असेच तुमच्या चरणापाशी भक्त असे मेळवा ॥
असाच असू द्या 'नागेशावर' अपुला नित्य ठसा ॥ ५ ॥

—श्री. नागेश मोगलाईकर 'नागलक्ष्मी' २८२० ग. नं. ४ धुळे ४२४००१

# बाबा ! मैंने लिया है तेरा सहारा



ओ ! साईनाथ भगवान करो कल्याण
ओ ! मेरे बाबा मैंने लिया है तेरा सहारा ॥

जो शरण तिहारे आते हैं
भवसागरसे तर जाते हैं
हे ! संकट मोचन हारा मैंने लिया हैं तेरा सहारा ॥ओ॥

तुम सत्य सनातन स्वामी हो
तुम परम कृपाके दानी हो
हम धरे जो ध्यान तुम्हारा, मैंने लिया हैं तेरा सहारा ॥ओ॥

"चंदु" की बीनती सुन लिजे
भक्तोंकी बीनती सुन लिजे
प्रभु प्रिय भक्ती आपकी दीजे
हम सब बने पूरण विधाना मैंने लिया हैं तेरा सहारा ॥ओ ॥

–सौ. चंद्राबेन विठ्ठलदास भाटे
जयंतव्हिला, वडाळा मुंबई

बी. ए. आर. सी. मधून अधिकारी पदावरून सेवा निवृत्त झाल्यावर ह्यूम पाईप्समध्ये नोकरी. सध्या आध्यात्मिक वाचन व लेखन करण्यात कालक्रमणा. गूढ-गुंजनवर अध्यात्मिक विषयावर उत्तमपैकी विचार लेखनातून व काव्यातून प्रदर्शित करतात.

# नाथ हरे साई नाथ हरे

नाम तुझे मी साई घेता
तिमिर व्यथेचे दूर सरे
नाथ हरे साई नाथ हरे
गित तुझे मी साई गाता
दिशां–दिशांतुनी मोद भरे
नाथ हरे साई नाथ हरे
ॐ जय जगदीश हरे ॥ १ ॥
मानवी जरि तू घेऊनी रूपा
पावन केली शिरडी रे
नाथ हरे साई नाथ हरे
ॐ कारातुनी तवावतारा
चराचरातुनी साई भरे
नाथ हरे साई नाथ हरे
ॐ जय जगदीश हरे ॥ २ ॥
व्यापुनी जरि तो साई विश्वा
भक्त–मानसी वास करे
नाथ हरे साई नाथ हरे
साई कृपेचा प्रसाद व्हाया
अंतर्मुख मत व्हावे रे
नाथ हरे साई नाथ हरे
ॐ जय जगदीश हरे ॥ ३ ॥

—श्री. एन्. जी. परुळेकर




बाबांवर काव्य लेखन करण्यात निपुण, उत्तमप्रकारची कीर्तने करण्यात तरबेज. अखिल भारतीय कीर्तन संस्थे-तर्फे 'कीर्तनालंकार' पदवीने विभूषित.

# चला जाऊ शिर्डी ग्रामी

चला जाउ शिर्डी ग्रामी
डोळा भरुनी पाहु साईची मूर्ती
भीमा चंद्रभागा करु मंगल स्नाना
साई चरणांची ती गंगा
चला जाऊ शिर्डी ग्रामी डोळा भरुनी पाहु सावली साईची मूर्ती
विटला प्रपंच तुटला संसार
धरु हाल मृदुंगांशी ताल
करु साई मंदिरी किर्तन
चला जाऊ शिर्डी ग्रामी डोळा भरुनी पाहु श्यामल साईची मूर्ती
विरक्तीच्या भाळी लावुनी बुक्का
गुलाब उधळु भक्ती प्रेमाचा
चला जाऊ शिर्डी ग्रामी डोळा भरुनी पाहु साईराम मूर्ती
शिव–शिव रुप होऊनी एक
ब्रम्हानंदे 'कला' झाली तल्लीन
नाचु लागली साईरंगी रंगुन
चला जाऊ शिर्डी ग्रामी डोळा भरुनी पाहु साईची मूर्ती

–सौ. कलावती वसंत चव्हाण
बी । ६ अंबाबाई मिस्त्री निवास, सेनापती बापट मार्ग, दादर २८

# " कसे होते हो माझे बाबा "



मूळ कारवारच्या पण सध्या महाराष्ट्रात स्थायिक. बाबांच्यावर गाढ श्रद्धा. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व श्रद्धास्थानी तीर्थाटन उत्तम प्रकारची काव्य रचना करण्यात सिद्धहस्त. भावुकतेने गातातही.

कसे होते हो, माझे बाबा पाहिलेत का कुणी, मज सांगा ? ॥ धृ० ॥
दिसत होते ते कुणासारखे
विष्णुसारखे का, शंकरासारखे,
का त्रैमूर्ती दत्तासारखे
सांगा ना, मज कुणीतरी दिसत होते ते कुणासारखे ? ॥ १ ॥
गोकुळेच्या कृष्णासारखे,
होते का ते खट्याळ भारी !
का अयोध्येच्या रामासारखे,
शांत, निरागस अन् शूर भारी ! सांगा ना मज कुणीतरी ॥ २ ॥
फोडत होते का, दह्या-दुधाचे माठ ?
का सांगत होते, भगवद्गितेचे पाठ ?
करत होते का राजपुत्रासम थाट ?
का चालत होते वनवासाची वाट ? सांगा ना मग कुणीतरी ॥ ३ ॥
करत होते का तुम्हावर प्रेम भारी ?
बसत होता का तुम्ही त्यांच्या दरबारी ?
भक्त होता का हनुमंतासम एक तरी ?
सांगा ना हो सांगा ? कसे होते माझे बाबा साई ॥ ४ ॥
ऐकण्याची या शशिस लागली बहु घाई !

— सौ. शशिकला रेवणकर, कुंटोली, अंबरनाथ.

# ॐ साई



मराठी व हिंदीतून अध्यात्मिक विषयावर विपुल गद्य व पद्यलेखन. श्रीसाईबाबा व त्यांच्या सहवासातील बहुतेक संत यावर काव्यरचना.

प्रभुचिन्तन, तू कर ले भाई
हर हर ओम् हर ओम साई ॥ ध्रु० ॥
नाद ब्रह्म की मंगल लहरी
पावन करती मन की नगरी
तपन मिटाये अंतर्मन की हर ओम् साई ॥ १ ॥
जैसे जैसे बढे साधना
भजन कीर्तन नित उपासना
लगे लगन फिर फिर गुरुदर्शन की हर ओम् साई ॥ २ ॥
गुरु भक्ति की महिमा न्यारी
उज्वल होवे काया सारी
रहे भावना नित समर्पण की हर ओम् साई ॥ ३ ॥
गुरु सेवा ही 'हरि' की सेवा
सेवा में ही मिलता मेवा
लीला ऐसी गुरु चरनन की हर ओम् साई ॥ ४ ॥
बिन गुरु ज्ञान जगत में दुर्लभ
'गुरुमंत्र' ही भवतारक सुलभ
आत्मशक्ति रे चिन्तन की हर ओम् साई ॥ ५ ॥
ॐ नमो शिवाय ॥ नमो साईनाथाय ॥

— श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन',
पाटकर वाड़ा, भगतसिंग पथ, डोंबिवली (पूर्व), ४२१२०१ जि. थाने.

# साई भक्तांची शिरडी नगरी

( चाल : साईबाबा गरिबांचे वाली )



श्री. व सौ. पोतनीस उभयता निस्सीम साईभक्त आहेत. बाबांच्यावर संपूर्ण कुटुंबाची गाढ श्रद्धा व भक्ती आहे.

( श्री साईलीला लेखक–कवी ६ वे संमेलनासाठी श्री क्षेत्र शिरडी येथे गेलो असतांना श्री साई भक्तांचा निरोप घेताना झालेली मनाची स्थिति यांचे वर्णन खालील कवितेत आहे. )

साईबाबा ऽ ऽ साईबाबा
साई भक्तांची शिरडी नगरी
आठां दिवसांची होते वारी
नाती जुळतात साई दरबारी साई भक्तांची शिरडी नगरी

माय, तात अन् बंधु भगिनी
कुशल पुसतात प्रेमभरानी
कोणी हात धरी
कोणी खांद्यावरी
कोणी थाप मारी पाठीवरी साई भक्तांची शिरडी नगरी

निरोप घेतांना साईबाबांचा
अन् प्रेमळ साई भक्तांचा
कष्ट होतात भारी
दुःख हृदयांतरी
डोळे पुसतात हो नर नारी साई भक्तांची शिरडी नगरी

आठां दिवसांची होते वारी
नाती जुळतात साई दरबारी साई भक्तांची शिरडी नगरी.

— श्री. डी. बी. पोतनीस, २६१७, एच. बी. पिंपरी.

# आस

[पुण्याचे साईभक्त श्री. सूर्यकांत गर्जे यांच्या पत्नी श्री. व सौ. गर्जे उभयतांना इतकेच नव्हे तर त्यांच्या छोट्या मंडळींनाही बाबांच्याबद्दल अतीव श्रद्धा आहे. बाबांच्या संबंधीत कुठेही कार्यक्रम असू द्या गर्जे कुटुंब तिथे हजर असतेच !]

अमृताहुनी गोड
नाम तुझे बाबा
मन माझे रंगले नामी तुझ्या ॥ धृ. ॥

शिरडी भासे मज
ती इंद्रपूरी
स्वर्गची जणू अवतरला
धरणीवरी ॥ १ ॥

समाधी मंदिरी
आरतीचे समई
मन माझे तव चरणी
वास करी ॥ २ ॥

अनंत कोटी
ब्रह्मांड नायका
मम मानस तव चरणी
दृढ होऊ दे
चरण कमली तव
नित्य नमू दे ॥ ३ ॥

**— सौ. सरला सू. गर्जे,**
८०, आखाडे बिल्डिंग, शिवाजी नगर, पुणे–५.

# साईबाबा माझी माऊली

[व्यवसायाने मुंबई महापालिकेत, उच्च विद्या-विभूषित. बाबांच्यावर निष्ठा व श्रद्धा ठेवून कोणतेही काम करतात.]

साईबाबा माझी माऊली
साईबाबा माझी साऊली ॥ धृ० ॥

संकट येता धावुनि येती
निज–भक्तांचे रक्षण करती ॥ धृ० ॥

आठवण येता तुमची चित्तीं
पावन करिती ब्रह्मानंदी ॥ धृ० ॥

तव लीलांचा महासागर
मार्ग दाविती महा–अपार ॥ धृ० ॥

तुमच्या रूपाचे प्रेमळ दर्शन
सगुण भक्तीचे रूप मनोहर ॥ धृ० ॥

तुम्हां गुणांचे करिता कीर्तने
शब्द–स्वरांची होती सुमने ॥ धृ० ॥

धन्य होई हो अवघे जीवन
तुझ्या स्मृतींनी उजळुनी क्षणक्षण ॥ धृ० ॥

—श्री. प्र. गो. कोळमकर,
बी.ए.बी.एड.,एल.एल.बी.,
१९–क, गुंफादर्शन दत्तपाडा,
बोरिवली पूर्व, मुंबई–६६.

# निरांजन



शिरडी निवासी कवायित्री म्हणून भाग्यवान. बाबांच्यावर विपुल काव्य लेखन. उत्तम गायिका, बाबांच्यावरील भजनांची, पदांची नेहमी समाधीमंदिरातून, चावडीतून हजेरी लावतात.

देवघरा मधे　दिवा　जळतो
साईवर　पडतो　प्रकाश
मी　निरांजनातील　वात ॥ धृ० ॥
देह　जरी　हृदय　निरांजन
आत्मा　ही　फूलवात ॥ १ ॥
निशिदिनी सेवा करीन साईची
ठेविन　मी　हृदयात ॥ २ ॥
मानस　पूजा　करीन　साईची
मूर्ती　नाही　ध्यानात ॥ ३ ॥
काय　चुकले　तव　सेवेसी
मी　बालक　तू　तात
मी　निरांजनातील　वात ॥ ४ ॥

— लिलावती कां. गुजराथी,

शिर्डी.

[पुण्यातील प्रसिद्ध डॉक्टर. साईबाबांवर गाढ श्रद्धा. काव्यातून साईभक्तीचा ओलावा.]

# आत्म्याची हाक

क्षणभंगूर आहे जीवन
नाहीं मानवा तुजला ही जाण ॥१॥
व्यर्थ जाई क्षणा परी क्षण
सोडूनी देई आता तरी 'मी पण' ॥२॥
स्वार्थापायी देह झिजविला
धुंदीमध्ये काळ दडविला ॥३॥
शेवटी उपरती तुजला होई
त्याचा उपयोग काही नाही ॥४॥
मनीं विचारी काय शाश्वत काय अशाश्वत
काय चिंतिले मी या जगांत ॥५॥
मोह माया नाही शाश्वत
राहू नको तूं त्यांच्या लोभांत ॥६॥
माझे मी पण सोडून देई
सार्थक या जन्माचे होई ॥७॥
शांती समाधी लागे मनीं हीं
निशिदिनीं स्मरता साई साई ॥८॥

— डॉ. ग. रा. कामत
११९४/१३ शिवाजीनगर पुणे ४११ ००५

☆

# कृतार्थ झाली जीवन श्रद्धा

कृतार्थ झाली जीवन श्रद्धा
स्मरतां, साईगुरूच्या पदां !
विजय-पराजय खंतच नुरली
सुखदुःखे मी तुवां अर्पिली
हर्ष,-खेद, भय-क्रोध, तृषेच्या
मला उरल्या क्षुधा-आपदा
...स्मरतां, साईगुरुच्या पदां !

कर्म यशीची तूंच प्रेरणा
तूंच स्वप्न, तूं सगुण रचना
ज्ञानयोग तू दिव्यत्कारी
स्वधर्म शिकवी होई मोक्षदा
...स्मरतां, साईगुरुच्या पदा !

तव भक्ति-ती माझी शक्ति
तव आशीश-ती मज श्रीमंति
तुझ्यात अवघी स्नेहल नाती
मी कान्हा-तू माय यशोदा
...स्मरतां साईगुरुच्या पदां

कृतार्थ झाली जीवन श्रद्धा !

-श्री. चंद्रशेखर लिगाडे
श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लि. कुमठे
पो. टिकेकरवाडी ता. उत्तार सोलापूर

[महाराष्ट्रातील संतवाङ्मयीन नियतकालिकातून लेखन विशेषतः पद्य लेखनाकडे जास्त ओढा.]

## ॥ शिरडीवासी साईनाथ ॥

नर जन्मा येऊनिया तुज नाही आठविले ।
संसारात राहुनिया तुज नाही आळविले ॥

मित्र पुत्र आणि भ्राते सारे जवळ मी केले ।
धन संपताच सारे मज सोडोनिया गेले ॥

स्वार्थाच्या या बाहुल्यांना किती किती जरी दिले ।
तृप्ती कधी झाली नाही अनुभवा मज आले ॥

धनापायी माझ्या मनी अहंभाव साठविला ।
'मी' पणातचि देवा सारा आयुष्य हा गेला ॥

आता मज वाटतसे तुज निशीदिनी गावे ।
कृपावंत बा साई अंतरात साठवावे ॥

मनीची ही तळमळ पुरी करावीच आता ।
शिरडीवासी साईनाथा चरणी ठेवितसे माथा ॥

—श्री. दशरथ रामजी तळेकर,
मुकेश मिल कंपौंड, ना. आ. सावंत मार्ग,
कुलाबा, मुंबई—४०० ००५.

# दर्शन घ्याया चला

दर्शन घ्याया चला, चला हो दर्शन घ्याया चला ।
शिरडी ग्रामी साईनाथ ते, पावती नवसाला ॥ धृ० ॥

अगाध महिमा लीला दाविती
जयाची असे त्यावर प्रिती ।
भक्तिभावे जे जन पूजिती
लाभ तया जाहला ॥ १ ॥

नामस्मरणी रंगुनी जाता
आधी व्याधी हरती चिंता ।
दीन दयाघन तारी पतिता
ध्यास जया लागला ॥ २ ॥

साई दयाघना सद्गुरुनाथा
तव चरणी हा विनम्र माथा ।
भवसागरी या तारी अनाथा
दाससख्या शरण आला ॥ ३ ॥

—श्री. स.मा. मुन्हार
चंदननगर मेडीकल रोड नागपूर

## दिघे — सुळे नांदा सौख्यभरे

आमच्या साईनिकेतन दादर कार्यालयातील अधिकारी कु. रेखाताई दिघे यांचे बंधु श्री. अनिल यांचा शुभविवाह चि. सौ. कां. सीमा (श्री. विष्णूपंत सुळे यांची कन्या) इजबरोबर दादर हिंदुकॉलनीत भगिनी समाजात रवि. ता. २८-१२-८० रोजी पार पडला.

# साई गीत तुषार

अशाच एके दिवशी द्वारकामाईतील भिंतीवर एक पाल खूप वेळ चुकचुकत होती. तिचे आनंदाचे गाणे साईना कळले. जवळ असलेल्या भक्तांना त्यांनी सांगितले. आज तिची लहान बहीण तिला भेटणार आहे. आज खरोखर ती आनंदी झाली आहे; आणि त्या आनंदाचे बोल मी जाणतो.

साईच्या ह्या शब्दांची प्रचिती भक्तांना त्याच दिवशी झाली. औरंगाबादेहून आलेल्या एका भक्ताच्या गाठोड्यातून एक पाल बाहेर आली, व सरळ भिंतीवर चढून आपल्या प्रिय बहिणीस भेटली. खरोखरच प्राणिमात्रांशी एकरूप झालेल्या त्या ईश्वराला प्राण्याची भाषासुद्धा अवगत होती.

## साईगीत तुषार (९)

आज का पाल अशी चुकचुकते
काय हो अघटीत हे घडते ॥ धृ० ॥

मशिदी मधल्या भिंतीवरती
कधी न येई पाल एकटी
असे काय हे अशुभ भासते, पालीला आज काय वाटले ॥ १ ॥
मशिदीमध्ये सारे पहाती
साई बाबा मनी जाणती
कुतूहलाने भक्त बोलले, साई मुखातून भविष्य हो आले ॥ २ ॥

आज यायची बहिण धाकुले
भेटीसाठी मन आतूरले
आनंदाचे गाणे गायले, जरा थांबता सारे हे कळले ॥ ३ ॥

औरंगाबादचे भक्त आले
पुजेसाठी साहित्य आणले
त्यामध्ये एक पाल सापडे, बोल खरे झाले ॥ ४ ॥

श्रीसाईबाबांच्या किर्तीचा सुगंध खेडोपाडी दरवळू लागला. शेकडो मैलावरून भक्तांच्या झुंडीच्या झुंडी शिर्डीला येऊ लागल्या आणि श्री साईच्या दर्शनाने पावन होऊन आनंदाने मार्गस्थ होऊ लागल्या. परंतु अशाच एके दिवशी वरुण राजाने

आपले थैमान शिर्डीला मांडले. दशदिशातून वादळी वारे वाहू लागले. ढगांनी कड-कडाट केला. वीजा जणू माहेरी आल्या. सारी शिर्डी जलमय झाली. अशा या बिकट परिस्थितीत साईभक्तांना तर मुंबईस जाणे अगत्याचे होते. त्यांनी आपली व्यथा कनवाळू श्री साईना सांगितली. साईंची मुद्रा गंभीर झाली. ओठावर ओठ आपटू लागले. हातात सोटा घेऊन साईनी आकाशाकडे पाहिले आणि अधिकारवाणीने त्या निसर्गाला शांत केले. भक्त आनंदी झाले व श्रीसाईंचा निरोप घेऊन साईलीलेच्या जयघोषात घरी गेले.

## साईगीत तुषार (१०)

साईलीला आज पहाया, मेघराज आला
उभ्या नभातून वाहू लागल्या, वर्षती श्रावण धारा ॥ धृ० ॥

भक्त निघाले घरी जावया
आर्शिवादे साई दिधला
वरुण राजाने कहर मांडीला, जलमय झाली वसुंधरा ॥ १ ॥

दिसा मागून दिस लोटले
वरुण राजाने मार्ग रोखले
सोटा घेवून साई उठले, चमत्कार दाविला ॥ २ ॥

आज खरोखर सत्य साईचे
मेघराजाला होते पहायचे
दाही दिशातून धावत आल्या, आकाशिच्या जलधारा ॥ ३ ॥

सोटा आपटून साई बोलले
मेघराजाला क्षणी नमविले
भक्त सारे मनी हर्षले, कृपाळू हा देव खरा ॥ ४ ॥

आज गोकुळ जलमय झाले
कृष्ण सारथी क्षणीं धावले
कृष्ण साई एक दाविण्या, आल्या हो या जलधारा ॥ ५ ॥

—श्री. सुहास देसाई
ऑटॉप हिल, मुंबई

# साभार पोच

**श्री जय अंबे गरबावली**—संग्राहिका व प्रकाशिका सौ. भारतीबेन चंद्रकांत शेटये, सी/४८ इंद्रदीप सोसायटी, एल. बी. एस. मार्ग घाटकोपर मुंबई. अंबामातेच्या सर्व आरत्या आणि गरबा गाण्याचा सुंदर संग्रह गुजरातीतून. मुखपृष्ठावर जगदंबेचे मनोहर चित्र

**साईगीते**—कवी कल्याण इनामदार, प्रकाशिका – सौ. श्रद्धा इनामदार २।३५ इलम महाल, रा. ब. सी. के. बोले मार्ग, दादर, मुं. २८ किंमत रु. १–५० पैसे, पृष्ठे ३२ रसाळ, ओळीबद्ध साईगीतांचा सुंदर संग्रह, मुखपृष्ठावर बाबांचे चित्र.

**श्रीनाथ गगनगिरी महाराज**–लेखक श्री. सुधाकर सामंत, प्रकाशक सुरेश तानवडे, ताडदेव बुकडेपो, नं. ५ सोनावाला बिडिंग, ताडदेव मुं. ७ पृष्ठे ३२ किंमत २ रु सिद्धयोगी श्री गगनगडकर महाराजांचे मुलांना तसेच मोठ्यांनाही वाचनीय असे ओघवत्या भाषेत लिहिलेले छानदार चरित्र, मुखपृष्ठावर महाराजांचे मनोहर तिरंगी चित्र.

**सण आणि सुट्या** –लेखक श्री. पु. वि. हर्षे प्रकाशक पुरुषोत्तम प्रकाशन, गिरगाव मुं. ४ पृष्ठे २३६ किंमत २२ रु. भारतातील हिंदु, मुस्लिम, ज्यू, ख्रिश्चन, जैन, शीख, बौद्ध या धर्मियांचा सण व उत्सवांची तसेच आमच्या राष्ट्रीय उत्सवांची कथारूप आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी सचित्र माहिती विद्यार्थ्यांनाच नव्हे तर सर्वांनाच उपयुक्त व संग्राह्य असे संदर्भ पुस्तक.

**श्रीसप्तशृंगी दर्शन व स्तोत्र**– लेखक–श्री. विनायक स. महाबळेश्वरकर, प्रकाशक–श्री. दि. द. जोशी, जयजवान ॲडव्हर्टायझर्स, विटावा, कळवा, ठाणे. देवीदर्शन पुस्तक सचित्र–किंमत–२ रु. ५० पैसे, पृष्ठ ४४ मराठीत श्री सप्तशृंगगडाची सचित्र माहिती व पाच अध्यायी श्री सप्तशृंगी देवीची पोथी. स्तोत्र–श्रीदेवीचे ८८ ओव्यात रचलेले पठणीय स्तोत्र. मूल्य अवघे ५० पैसे. मुखपृष्ठावर श्रीदेवीचे चित्र.

**माऊली काशीबाई चव्हाण**—लेखक–श्री. पु. बा. कुलकर्णी, प्रकाशक श्री जांभेकर महाराज समाधि मंदिर, जांभेकर महाराज पथ, चौपाटी दादर, मुं. २८ मूल्य १५ रु. पृष्ठे–३२८ श्री रामकृष्ण महाराज जांभेकर व श्री नामदेव महाराज केळकर या दोन थोर सिद्ध संत पुरुषांची तळमळीने निष्ठेने हयातभर सेवा केलेल्या थोर गुरु माऊलीचे गुरुभक्ती व गुरुसेवा कशी करावी याचे रसाळ वर्णन करणारे आदर्श चरित्र, प्रस्तावना श्री. सदानंद चेंदवणकर कार्यकारी संपादक श्रीसाईलीला यांची.

**अणंत कानेकर**—लेखक– श्री. अच्युत बाळकृष्ण परमानंद प्रकाशक तक्षशिला प्रकाशन, ५१५ भारत इंडस्ट्रीयल इस्टेट टोकरसी जीवराज मार्ग, शिवडी मुं. १५ पृष्ठे ९६ किंमत १५ रु. प्रख्यात दिवंगत साहित्यिक प्रा. अनंत काणेकर यांच्या जीवनातील १०० रंजक आठवणी नि आख्यायिका लेखकाने छानदार भाषेत लिहून त्या या पुस्तकातून संग्रहीत केल्या आहेत त्यामुळे पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचनीय झाले आहे. पुस्तकात कै. काणेकरांच्या संबंधीची आर्टपेपरवर छापलेली आठ पानांची चित्र पुरवणी पण आहे.

" शिरडीस ज्याचे लागतील पाय टळती अपाय सर्व त्याचे "

॥ श्री दत्तमहाराज प्रसन्न ॥

सोन्याची शुध्दता आणि सुबक व कलात्मक दागिने
तयार करणारी एकमेव विश्वासार्ह पेढी

**मे. शंकर हरी वैद्य (रत्नागिरीकर)**
**आणि कुष्टे ज्युवेलर्स**

पाठारे मॅन्शन, ले. ज. रोड, सिटीलाईट सिनेमाजवळ,
माहीम, मुंबई क्रमांक–४०० ०१६.

# शिरडी-वृत्त माहे नोव्हेंबर सन १९८०

या महिन्यात श्रीसाईबाबांचे समाधि दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

कीर्तन :– १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

प्रवचन :– १) ह. भ. प. वाक्चौरे, लक्ष्मणबुवा शिरडी यांचे प्रवचन झाले.
२) ह. भ. प. नारायण का. कुलकर्णी, पंढरपूर यांचे प्रवचन झाले.

गायन वादन १) श्री. आयशीराम मे. मनुजा, मुंबई.
भजन वगैरे २) सौ. ज्योती आ. मनुजा, मुंबई.
३) महेशकुमार आ. मनुजा, मुंबई.
४) कु. चांद आ. मनुजा, मुंबई ५) सौ. आरती अ. जाधव, वसई ६) कु. विश्वा-वरी अंतरकर, वसई ७) श्री. दिव्यानंद नाथन्, भोपाळ ८) श्री. नारायण नाथन्, भोपाळ ९) श्री. विठ्ठलराव शिंदे, मुंबई १०) श्री. रतनलाल टिक्कू, मुंबई ११) श्री. अनिलकुमार पगारे, मुंबई १२) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुंबई १३) सौ. तितिक्षा बलसारी, मुंबई १४) कु. वंदना शिरोडकर, मुंबई १५) कु. मंदार व. जोशी, मुं. १६) कु. विश्वनाथ शिरोडकर, मुं. १७) कु. मिलींद जोशी, मुं. १८) श्री. गोपीनाथ वाळके, मुं. १९) श्री. वसंतराव चोडणकर, मुं. २०) श्री. मोहन शिरोडकर, मुं. २१) श्री. वसंतराव दा. पवार, सातारा २२) डॉ. व्ही. के. भाटे, मुं. २३) सौ. चंद्राबेन व्ही. भाटे, मुं. २४) कु. कृष्णा व्ही. भाटे, मुं. २५) सह्याद्री ब्रॅश बँड, चेंबूर, मुं. २६) श्री. त्र्यंबक रा. कान्हेरे, सातारा २७) श्रीसद्गुरू स्वामी प्रासा-दिक बालमित्र भजनी मंडळ, दादर मुं. २८) श्री. ॐ जय जय रामकृष्ण हरी भजन मंडळ, कुर्ला, मुं. २९) श्री. दत्तात्रेय तुं दयाळ, सातारा ३०) श्री भगवती साई संस्थान रेल्वे कॉलनी, कुर्ला, मुं. ३१) श्री. चंद्रशेखर कर्णिक, पुणे ३२) सौ. शालन च. कर्णिक, पुणे.

कार्तिकी महाएकादशी :—कार्तिकी महा एकादशीनिमित्त श्रींचे समाधि मंदि-रात कीर्तन, रात्री श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक भारुड गारुड कार्यक्रम झाले. पालखीची मिरवणूक गावातून ११-१५ ला आल्यानंतर शेजारती झाली.

तुलशीविवाह :– सालाबादप्रमाणे द्वारकामाईत तुलसीविवाह कार्यक्रम थाटात साजरा झाला. कार्यक्रमास साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना प्रसाद वाटण्यात आला.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# शिरडी–वृत्त माहे डिसेंबर सन १९८०

या महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनासाठी साई भक्तांची प्रचंड गर्दी होती. नाताळाची सुट्टी व सहलीमुळे यात्रेचे स्वरूप आले होते. दि. २५–१२–८० रोजी गुरुवारी गर्दीने उच्चांक गाठला होता. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :

**कीर्तन :** १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) श्रीराम श्री. देव ठाणे यांचे कीर्तन झाले.

**प्रवचन :** ह. भ. प. निवृत्तिराव पाटील यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन, वादन, नृत्यवगैरे :** १) श्री. मारुती हि. पाटील, मुंबई. २) सौ. मालन सु. कोल्हापूरकर, कोल्हापूर. ३) श्रीमती अबान ब. मिस्त्रि, मुंबई. ४) कु. के. की जिजिना मुंबई. ५) कु. मुकुंद श्री. देव ठाणे. ६) सौ. मंजिरी श्री. देव ठाणे. ७) श्री. विष्णू र. गोडे, मु. ८) सौ. उषा वि. गोडे, मुंबई. ९) श्री. चंद्रकांत वि. गोडे मुंबई. १०) श्री. विठल दि. पत्की, मुंबई. ११) श्री. शेखबाबा कोपरगाव. १२) रमेश कुमार आ. चावरे शिरडी. १३) श्री. तुकाराम अ. मिरचे गाणगापूर. १४) सौ. सुमती धर्माधिकारी मुंबई. १५) श्री. कुमारसेन गुप्ते, मुंबई. १६) श्री. महेशकुमार नर्गिसराव. १७) सौ. मधुवंती मु. निराशी, मुंबई. १८) श्री. मुकुंद सि. निराशी, मुं. १९) श्री. सदाशिव के. बर्वे मुं. २०) श्री. विजय प्र. ठोंबरे, वसई. २१) श्री. साईबाबा सोसायटी भजन मंडळ हैद्राबाद. २२) श्री. इंद्रप्रकाश मेहता, चंदीगड. २३) पांडुरंग पु. जोशी, ग्वालियर. २४) कुमारी वसंत सेना २५) कु. मैथीली. २६) श्री. एस. बालचंद्रन् २७) श्रीमती व्ही. महालक्ष्मी. २८) श्रीमती व्ही. सरस्वती. २९) श्री. आर. गोपालकृष्ण. ३०) श्री. मूर्ति ३१) श्री. सावंत ३२) श्री. पी. एन. पै. ३३) सौ. मुक्ता पै, चेंबूर मुंबई.

श्रीदत्त जयंती : गुरुवार दि. २१-१२-८० रोजी दत्तजयंती दिवशी साईभक्तांची गर्दी बरीच होती. सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कीर्तन झाले. दत्तजन्म कार्यक्रम झाल्यावर धूपारती झाली. मंदिरातील कार्यक्रम आटोपल्यावर लेंडीबागेतील दत्तमंदिरात आरती झाली व उपस्थीत भक्तांना प्रसाद वाटण्यात आला.

रात्रौ ९-१५ ते ११-१५ पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

हवापाणी : शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे थंडी असते.

# साईबाबा मंदिराचे विक्रमी उत्पन्न

शिर्डी येथील साईबाबा मंदिरातील दक्षिणा पेटीतील डिसेंबर महिन्याचे उत्पन्न विक्रमी झाले. या महिन्यात २ लक्ष ४५ हजार ७२२ रुपये त्या पेटीत मिळाले. हा आतापर्यंतचा विक्रम आहे.

जानेवारी ते डिसेंबर ८० अखेर एका वर्षात केवळ दक्षिणा पेटीत २२ लाख ९२ हजार ५३५ रुपये ८४ पैसे संस्थानला मिळाले. हाही आतापर्यंतचा उच्चांक आहे. याशिवाय रोज २५० मनिऑर्डर्स येतात. रोख चेक्स दागदागिने आदि रूपानेही मोठ्या प्रमाणावर दाने या संस्थानमध्ये जमा होतात. तिरुपती बालाजीनंतर साईबाबा संस्थानचा प्रगती व उत्पादनात दुसरा नंबर लागतो.

# श्री. साईपरिवार वृत्त विशेष

● साईभक्त श्री. विष्णू वासुदेव प्रभु व सौ. नीलाताई प्रभु यांचे सुपुत्र चि. महेश यांचा शुभविवाह कै. रामचंद्र नेमळेकर यांची कन्या सुनिता इजबरोबर मंगळवार ता. २-१२-८० रोजी द्वारकानाथ भवन हॉल कात्रक रोड, वडाळा येथे थाटात साजरा झाला. वधुवरांना शुभाशिष देण्यासाठी साईभक्त व विविध व्यवसायी व्यक्ती बहुसंख्येने हजर होत्य.

● साईभक्त श्री. मुरलीधर बांदिवडेकर व सौ. सुलभा बांदिवडेकर यांची कन्या सुरेखा हिचा विवाह ३-२-८० रोजी कर्नाटक संघ हॉल टी. एच. कटारिया मार्ग माटुंगारोड माहिम येथे श्री. नरेश रेडकर यांचे चिरंजीव चि. बिनायक यांचे बरोबर थाटाने साजरा झाला.

● **साईधाम गिरगाव** येथील श्रीबाबांची मूर्ती रविवार ता. ३०-११-८० रोजी सायंकाळी गिरगाव चौपाटीवर वाजत गाजत मिरवणूकीने नेऊन तिचे विजर्जन करण्यात आले. या मूर्तीच्या जागी नवीन मूर्ती बसविण्याचा समारंभ दत्तजयंतीस थाटाने पार पडला.


● **श्री. विद्याधर स्वामी शक्तिपीठ पनवेल** येथे रवि. ता. २१-१२-८० रोजी श्रीदत्तजयंतीचा उत्सव थाटात साजरा झाला. दर्शनासाठी व महाप्रसादासाठी दुरदुरून भक्तमंडळी आली होती.

● **श्रीसमर्थ सद्गुरु भालचंद्र महाराज कणकवली** यांचा तृतिय पुण्यतिथी उत्सव १४-१२-८० रोजी श्रीसमर्थ स्मृति मंदिर, लालबाग येथे थाटात साजरा झाला. संबंध दिवसभर विविध कार्यक्रम आयोजित केले गेले होते. श्रीबाबा महाराज सातारकर यांचे प्रवचन छान झाले.

● **श्रीसद्गुरु साईनाथ सेवा मंडळ, लालबाग** भक्तांचे ३० वे स्नेहसंमेलन ८ डिसेंबर ते १४ डिसेंबर ८० पर्यंत साजरे झाले. आत्माराम बुवा बांदेकर यांचे किर्तन व श्री. चंद्रकांत तिर्लोटकर व दत्त मिराशी बुवा यांचे भजनाचे कार्यक्रम छान झाले.

● परळचे साईभक्त श्री. श्रीराम साताडेंकर यांचे बंधू श्री. मधुसूदन उर्फ बबन यांचे ४ डिसेंबर ८० रोजी अंधेरी येथे अचानकपणे देहावसान झाले. निधन समयी त्यांचे वय ४२ वर्षाचे होते. त्यांचे पश्चात पत्नी व भाऊ दोघे बंधू व अन्य परिवार आहे. श्रीसाई मृतात्म्यास सद्गती देवो.

# श्री. तातू देशपांडे साईचरणी विलीन



दादरचे प्रसिद्ध वयोवृद्ध साईभक्त श्री. विठ्ठल यशवंत उर्फ तातू देशपांडे यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी ४-१-८१ रोजी देहावसान झाले. १९१६ साली त्यांनी बाबांचे प्रथम दर्शन घेतले. आपल्या अंध आजोबांना घेऊन ते त्यावेळी शिर्डीस गेले होते. बाबांच्या दर्शनाने त्यांचे अंधत्व दूर होऊन त्यांना अक्षरशः स्पष्ट दिसावयास लागले त्यामुळे छोट्या विठ्ठलरावांची बाबांवर कायमची श्रद्धा बसली. १९३७ सालापासून तातू नियमितपणे दरवर्षी शिर्डीस बाबांच्या सर्व उत्सवांना हजर राहात होते. शिर्डीस मुख्य उत्सवाच्या दिवशी सकाळीच निघणाऱ्या पोथी मिरवणूकीच्या बरोबर तंबोरा घेऊन ते हमखास दृष्टीस पडत असत. ८० सालीच्याही सर्व उत्सवात ते होते. त्यांच्यामागे पत्नी, चिरंजीव, सून व नातवंडे असंख्य साईभक्त मित्र असा परिवार आहे. श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो. श्रीसाईबाबा संस्थानतर्फे आम्ही तातूजींना श्रद्धांजली वाहात आहोत.

☆

# श्री मोहिते बाबांच्या साईनाथ मंदिरासाठी

## शिरडीचे श्रीसाईबाबाचा प्रयोग



श्री. मोहितेबाबा

वरळी बांबोरी मैदानातील प. पू. श्री मोहिते. बाबांच्या श्रीसाईनाथ मंदिर (ट्रस्ट)च्या नूतनीकरण व विस्ताराच्या कार्यासाठी म्हणून आरती थिएटर्सच्या शिरडीचे श्रीसाईबाबा या नाटकाचा प्रयोग ता. १७–१–८१ रोजी रोजी रात्रौ ९ वा. प्रभादेवी येथील रविंद्र नाट्यमंदिरात सादर करण्यात आला होता. साईभक्तांनी या प्रयोगाला हजर राहून याचे स्वागतच केले. प्रयोगापूर्वी झालेल्या छोट्या समारंभात विश्वस्त श्री. श्री. अनंत तुकाराम उर्फ अण्णासाहेब बागवे यांनी स्वागतपर विश्वस्त श्री. चंद्रकांत सामंत यांनी प्रास्ताविक व विश्वस्त श्री. प्रकाश परब यांनी आभार प्रदर्शनाचे अशी भाषणे केली. श्री. मोहितेबाबांनाही अनेक भक्तांनी पुष्पहार घालून त्यांचा गौरव केला. आरती थिएटर्सचे संचालक श्री. कुमारसेन गुप्ते व सौ. गुप्ते यांचाही श्री. मोहिते बाबांनी पुष्पहार घालून सत्कार केला.

# पुण्याचे साईभक्त एस रामकृष्णन यांचे निधन

पुण्याचे प्रसिद्ध साईभक्त व शिवाजी नगर येथील श्रीसाईदास मंडळाचे चिटणीस श्री. एस. रामकृष्णन यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. मद्रास राज्यात एका खेडेगावी १९०२ साली त्यांचा जन्म झाला. १९४२ साली ते पुण्याला आले व १९४७ साली ते शिवाजी नगर येथील श्री. नानासाहेब रासनेच्या श्रीसाईबाबा मंदिरात गेले. त्या साईसंस्थेशी त्यांचा परिचय वाढत गेला व त्या संस्थेचे ते अध्वर्यू होते. बाबांचे अखंड नामस्मरण व चिंतन हा त्यांचा स्वभाव धर्म होता.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती देवो.